## आकाशातून घरावर पडला ५० किलोचा धातुचा तुकडा



**नागपूर** : उपराजधानी नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यात एक धातूचा तुकडा घरावर पडल्याने एकच खळबळ उडाली आहे. आकाशातून हा तुकडा इमारतीवर पडला तेव्हा मोठा आवाज झाल्याचे स्थानिक लोकांनी सांगितले. आवाज येताच सर्व लोक घाबरून घराबाहेर पडले. कोसे लेआऊटमधील स्थानिक नागरिक अमेय बसवेश्वर यांच्या घरावर धातूचा तुकडा पडल्याने छतावरील भिंतीचा भागही तुटल्याची माहिती आहे. पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. हा तुकडा पोलीस ठाण्याला नेण्यात आला आहे. तुकडा ५० किलो वजनाचा असून अंदाजे १० ते १२ एमएम जाडीचा आणि चार फूट लांब आहे. आकाशातून पडलेला हा तुकडा एखाद्या उपग्रहाचा किंवा विमानाचा भाग असू शकतो, असा अंदाज आहे. हा तुकडा नेमका कशाचा आहे हे तपासले जात आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २७३
www.ramprahar.com

सोमवार, २१ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


भूतान येथे रंगले आंतरराष्ट्रीय आगरी साहित्य संमेलन/२

खालापुरात लग्न जमवतानाही डोक्यावरील हंडा अडसर/५

वाल्मिकी समाजातर्फे महिला क्रिकेट स्पर्धा उत्साहात/८


# महिला सक्षमीकरणासाठी सरकार कटिबद्ध

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही; पिंक ई-रिक्षांचे वितरण

**नागपूर : प्रतिनिधी**

महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबद्ध असून विविध योजनांच्या माध्यमातून हे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. महिला व बाल विकास विभागाच्या वतीने पिंक ई-रिक्षा योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. २०) येथे केले. या वेळी लाभार्थी महिलेच्या पिंक ई-रिक्षातून प्रवास करत त्यांनी महिलांना कृतिशील विश्वासही दिला.




नागपूर येथील नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात पिंक ई-रिक्षा योजनेंतर्गत जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पिंक ई-रिक्षा वितरित करण्यात आल्या. महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार संदीप जोशी, डॉ. आशिष देशमुख, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, महिला व बाल विकास आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी कार्यक्रमास उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्र शासनाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने विविध निर्णय घेतले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महिला व बालविकास विभागाने पिंक ई-रिक्षा या महत्त्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे तसेच कामकाजी महिलांना या महिलांच्या ऑटो रिक्षामध्ये बसून सुरक्षित प्रवास करण्याची हमीही या योजनेने दिली आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र लाभार्थी महिलांना ई-रिक्षा वितरित झाल्या असून जिल्ह्यात दोन हजार महिलांना या योजनेंतर्गत ई-रिक्षा वितरीत होऊन रोजगार उपलब्ध होणार आहे.

नागपूर शहरातील विविध मेट्रो स्टेशनवर प्रवाशांना फिडरसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बाल विकास विभाग आणि महामेट्रोदरम्यान करार झाला आहे. यातून पिंक ई-रिक्षाधारक महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध होणार आहे. राज्याच्या पर्यटन विभागासह अन्य विभागासोबत भविष्यात असे करार करून या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्य शासनाने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी पिंक ई-रिक्षा ही योजना आणली आहे. राज्यातील आठ जिल्ह्यांत ही योजना राबविण्यात येत असून पहिल्या टप्प्यात येत्या सहा महिन्यांत पाच हजार रिक्षा वितरीत करण्याचे उद्दिष्ट आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना ई-रिक्षा वितरित करून पहिल्या टप्प्यातील वितरणाची सुरुवात झाली आहे. या महिलांना किमान दहा दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. पाच वर्षांचा रिक्षाचा मेंटेनन्स आणि चार्जिंगची व्यवस्थाही त्यांना करून देण्यात आली आहे.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात ११ पात्र महिला लाभार्थ्यांना ई-रिक्षाच्या चाव्या वितरित करण्यात आल्या.

### मुख्यमंत्र्यांनी केला पिंक ई-रिक्षातून प्रवास

कार्यक्रम संपल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरातील सन्याल नगर, टेका नाका नारीरोड येथील पूजा नरेंद्र वानखेडे यांच्या पिंक ई-रिक्षातून महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्यासह प्रवास केला. या पिंक ई-रिक्षाचे पहिले प्रवासी होण्याचा मान मिळवत त्यांनी महिलांना विश्वासही दिला.

## मुंबई-चेन्नई एक्स्प्रेसमधून २९ बालकांची संशयास्पद वाहतूक

### रेल्वे पोलिसांची कारवाई; एक जण ताब्यात

**कर्जत : प्रतिनिधी**

एलटीटी-चेन्नई एक्स्प्रेस (गाडी क्रमांक १२१६३ डाउन)मधून एक व्यक्ती २९ लहान मुलांसह संशयास्पद



परिस्थितीत प्रवास करीत असल्याने रेल्वे पोलिसांनी तातडीने कर्जत येथे कारवाई केली. त्या व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, तर सर्व बालकांना वैद्यकीय तपासणी करून बालगृहात संरक्षणार्थ ठेवण्यात आले आहे.

शिवसेना नेत्या आकांक्षा शर्मा-सावंत व त्यांच्या सहकारी सेजल नागावकर यांनी ही बाब रेल्वे जीआरपीच्या १५१२ या हेल्पलाईन क्रमांकावर कळवली होती. त्यानुसार १८ एप्रिल रोजी रात्री ८.३५ वाजता कर्जत स्टेशनवर चेन्नई एक्स्प्रेस आल्यानंतर पोलिसांनी डब्यात तपासणी केली. या वेळी २९ लहान मुले व त्यांच्या सोबत असलेल्या व्यक्तीला खाली उतरवले. या व्यक्तीचे नाव मोहम्मद जलालउद्दीन मोहम्मद फिदा हुसैन सिद्दीकी (वय २८) असून तो बिहार राज्याच्या अररिया जिल्ह्यातील जोकीहाट ब्लॉकमधील रहिवासी आहे. त्याने दिलेल्या माहितीनुसार ही सर्व मुले त्याच्या नातेवाईकांची असून कर्नाटकातील रायचूर येथील मदरशामध्ये कुराण व उर्दू शिक्षणासाठी नेण्यात येत होती. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे.

# भाजप संघटन पर्व : पनवेल, उरण मतदारसंघातील मंडळ अध्यक्षांची नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे संघटन पर्व सध्या सुरू आहे. त्याला अनुसरून पक्षाच्या पनवेल तालुका ग्रामीण मंडळ अंतर्गत नेरे मंडळ अध्यक्षपदी भूपेंद्र पाटील आणि तळोजा मंडळ अध्यक्षपदी दिनेश खानावकर यांची नियुक्ती रविवारी (दि. २०) करण्यात आली. दरम्यान, पनवेल शहर मंडळ अध्यक्षपदी युवा नेते सुमित झुंझारराव यांची नियुक्ती झाली आहे.

सुकापूर येथील बैठकीत भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत भूपेंद्र पाटील यांची नेरे मंडळ अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. पाटील हे भाजपचे निष्ठावान कार्यकर्ते असून त्यांनी यापूर्वी पक्षाच्या विविध पदांवर यशस्वीपणे काम केले आहे. भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भूपेंद्र पाटील यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या तसेच पक्षवाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन केले. (पान २ वर..)



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**उरण : रामप्रहर वृत्त**

भाजप संघटन पर्व अंतर्गत उरण विधानसभा मतदारसंघातील मंडळ अध्यक्षांची रविवारी (दि. २०) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती करण्यात आली.

उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्षपदी धनेश गावंड, उरण शहर मंडळ अध्यक्षपदी प्रसाद भोईर, पनवेल तालुका ग्रामीण मंडळ अंतर्गत गव्हाण-वडघर अध्यक्षपदी रूपेश धुमाळ, पनवेल तालुका दक्षिण अध्यक्षपदी मंगेश वाकडीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या सर्वांचे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मावळते तालुका अध्यक्ष रवि भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, जीवन गावंड, सरचिटणीस सुनील पाटील, कैलास भोईर, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

तरुण आणि उत्साही नेतृत्वामुळे उरण विधानसभा क्षेत्रात भाजप संघटना अधिक मजबूत होईल. हा युवावर्ग आपल्या कामातून पक्षाला नवी उंची गाठून देईल, असा विश्वास लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केला.

## निवडक

### जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी; तीन जणांचा मृत्यू, जनजीवन विस्कळीत

**रामबन** : जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाऊस पडत आहे. अशातच रविवारी (दि. २०) सकाळी रामबन जिल्ह्यातील सेरी बागना भागात ढगफुटीसदृश्य पाऊस झाला तसेच वारा आणि गारपीटीमुळे तीन जणांचा मृत्यू झाला आहे. अनेक ठिकाणी घरे, दुकाने, हॉटेल्सचेही नुकसान झाले आहे. या परिस्थितीमुळे अनेकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे.

### डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणात महिलेला अटक

**सोलापूर** : येथील प्रसिद्ध न्युरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी एका महिलेविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. वळसंगकर यांच्या रुग्णालयातील प्रशासकीय अधिकारी मनीषा मुसळे-माने हिला शनिवारी रात्री अटक करण्यात आली. डॉ. वळसंगकर यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा तिच्यावर दाखल करण्यात आला आहे. आत्महत्येपूर्वी डॉ. वळसंगकर यांनी एक चिठ्ठी लिहलेली होती. यामध्ये मनीषा मुसळे-माने हिच्यामुळेच टोकाचे पाऊल उचलत असल्याचा आरोप चिठ्ठीत केला आहे. कोर्टाने आरोपीला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### आरसीबीने पंजाबला घरच्या मैदानावर हरवून काढला वचपा

**मुल्लनपूर** : आयपीएलमध्ये (दि. २०) दुपारच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्जला त्यांच्याच घरच्या मैदानात सात विकेट्सने पराभवाचे पाणी पाजले. यासह त्यांनी दोन दिवसांपूर्वीच पंजाबकडून घरच्या मैदानात झालेल्या पराभवाचा वचपाही काढत फिट्टमफाट केली. पंजाबने बंगळुरूसमोर १५८ धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे बंगळुरूने १८.५ षटकांत तीन गडी गमावत पूर्ण केला. विराट कोहली (नाबाद ७३) आणि देवदत्त पडिक्कल (६१) यांनी शानदार अर्धशतके झळकावली.

## भाजप संघटना मजबूत करणे हेच माझे प्राथमिक उद्दिष्ट -पंडित पाटील



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

माजी आमदार पंडित पाटील यांच्या भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर श्रीवर्धनच्या कार्यकर्त्यांमध्येही नवचैतन्य संचारले आहे. पाटील यांच्या श्रीवर्धन येथील निवासस्थानी पक्षाच्या विविध पातळीवरील कार्यकर्त्यांनी सदिच्छा भेट घेतली आणि पुष्पगुच्छ देत त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

या भेटीदरम्यान कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पंडित पाटील यांनी म्हणाले की, पक्षवाढीसाठी मी कटिबद्ध आहे. स्थानिक कार्यकर्त्यांचे प्रश्न, अपेक्षा आणि गरजा समजून घेत त्यावर काम करणार आहे. कार्यकर्त्यांच्या बळावर संघटना मजबूत करणे हेच माझे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

या भेटीवेळी भाजप शहर अध्यक्ष लक्ष्मण पावशे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष सुप्रिया चोगले, रविना गुरव, माजी नगरसेवक वसंत यादव, रमेश चोगले, गितेश मयेकर, उदेश करदेकर, मकरंदर पोलेकर, रोशन बोरकर, रवींद्र चौलकर, वीरेंद्र पोलेकर परेश पोलेकर सहभागी झाले होते.

पक्षाच्या आगामी वाटचालीसाठी ही भेट अत्यंत सकारात्मक ठरली असून कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेला पाठिंबा आणि पंडित पाटील यांचा अनुभव यामुळे श्रीवर्धनमधील भाजप संघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

## स्विमिंग पूलमध्ये बुडून लहान मुलीचा मृत्यू

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथे पर्यटनासाठी आलेल्या पुण्यातील एका कुटुंबातील पाच वर्षीय मुलीचा स्विमिंग पूलमध्ये बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. अन्वी चक्रधर ताकभाते असे मृत मुलीचे नाव आहे.

पुण्यातील थेरगाव येथे राहणारे चक्रधर कृष्णा ताकभाते यांचे कुटुंब पर्यटनासाठी मुरूडमध्ये आले होते. त्यांनी सी शेल हॉटेलमध्ये मुक्काम करण्याचे ठरवले. तेथे त्यांची मोठी मुलगी माही व लहानगी अन्वी या दोघी कोणाला काही न सांगता हॉटेलच्या खाली खेळण्यास आल्या. खेळता खेळता यातील अन्वी स्विमिंग पूलमध्ये पडली व पाण्यात बुडून तिचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद मुरूड पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## माजी आमदार संग्राम थोपटे उद्या करणार भाजपमध्ये प्रवेश

**पुणे : प्रतिनिधी**



भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सभासदत्वाचा राजीनामा दिला आहे तसेच रविवारी (दि. २०) कार्यकर्त्यांबरोबर बैठक घेऊन आपली पुढील भूमिका स्पष्ट केली. थोपटे हे येत्या २२ एप्रिल रोजी भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत, अशी माहिती त्यांनी स्वतः पत्रकार परिषदेत दिली.

काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर आता संग्राम थोपटे हेदेखील काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देणार असल्यामुळे राज्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, थोपटे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना आपल्यावर काँग्रेसनेच पक्ष सोडण्याची वेळ आणली असल्याचे म्हटले. त्याचप्रमाणे आपल्याला अनेकदा डावलण्यात आल्याचा आरोपही त्यांनी या वेळी पक्षनेतृत्वावर केला.

देशात आणि राज्यात भाजपचे सरकार सत्तेत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांचे मत आहे की, आपल्या मतदारसंघात विकासकामांना जर गती द्यायची असेल तर भाजपमध्ये प्रवेश केला पाहिजे. त्यानुसार मी २२ एप्रिल रोजी भाजपत प्रवेश करणार आहे. माझ्याबरोबर अनेक कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करतील, अशी माहिती संग्राम थोपटे यांनी दिली.

## मराठीचा सातासमुद्रापार डंका!

### चार चित्रपटांची कान्स आंतरराष्ट्रीय महोत्सवात निवड



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने फ्रान्समधील कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी तीन मराठी चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. यात 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर' आणि 'खालिद का शिवाजी' या तीन मराठी चित्रपटांचा समावेश आहे, तर 'जुनं फर्निचर' या चित्रपटाची विशेष निवड करण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी रविवारी (दि. २०) दादर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

फ्रान्समध्ये येत्या १४ ते २२ मे या कालावधीत कान्स चित्रपट महोत्सव होणार आहे. या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा चार मराठी चित्रपटांची एन्ट्री झाली आहे. महामंडळामार्फत सन २०१६पासून कान्स महोत्सवातील फिल्म मार्केटमध्ये मराठी चित्रपट पाठवले जात आहेत. मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचावा व जागतिक सिनेप्रेमींना मराठीची भुरळ पडावी हा यामागचा हेतू आहे.

## तापमानाचा भडका! विदर्भात पारा ४४.७ अंशावर

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात सगळ्याच भागात तापमानाने नागरिक हैराण झाले आहेत. विदर्भ तर प्रचंड तापला असून बहुतांश ठिकाणी ४०-४५ अंश सेल्सियसच्या दरम्यान नोंदी होत आहेत. हवामान खात्याने नोंदवलेल्या कमाल तापमानानुसार रविवारी (दि. २०) राज्याच्या उपराजधानी नागपुरात तब्बल ४४.७ अंश सेल्सियसची नोंद करण्यात आली. हे राज्यातील सर्वाधिक तापमान आहे.



अकोल्याचा पारा ४४.३ अंश सेल्सियसवर आहे, तर संपूर्ण विदर्भाचे तापमान ४० अंश सेल्सियसच्या पुढे आहे. मराठवाडाही तापला असून परभणीत ४३.६ अंश, तर बीड ४२ अंशांवर स्थिरावले आहे.

याशिवाय संपूर्ण कोकणपट्ट्यात तसेच मुंबई व उपनगरात प्रचंड उकाडा जाणवतोय. उन्हाचा चटका असह्य झाला आहे. दरम्यान, येत्या पाच दिवसांत सिंधूदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर सांगलीत हलक्या पावसाची शक्यता वगळता अन्य कुठेही पावसाची शक्यता नसल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

तीन दिवसात मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना उष्ण व दमट हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्ये प्रचंड उष्ण हवामान राहणार आहे. पुणे, सोलापूर जिल्ह्यातही उष्ण व दमट हवामानाचा इशारा देण्यात आलाय. याशिवाय छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, अकोला, नागपूरमध्ये उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. किमान तापमानाचा पाराही सध्या सामान्यहून अधिक असल्याने मुंबई व उपनगरात तापमान अधिक नोंदवण्यात आले.

# मोतीबिंदूमुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वीतेसाठी शासन कटीबद्ध -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

नागरिकांचे आरोग्य प्राधान्यक्रमावर ठेवून नागरिकांच्या आरोग्यविषयक अनेकविध योजना शासनामार्फत सुरू करण्यात आल्या आहेत. वयस्क लोकांमध्ये मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता टाळण्यासाठी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वी करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. शासनाचे हे मिशन पूर्णत्वास नेण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड या संस्थेने



सर्वतोपरी सहकार्यासाठी पुढाकार घेतला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन सुरू आहे. शासनाने हाती घेतलेल्या या मिशनची २०१८ मध्ये नव्याने सुरुवात करण्यात आली आहे. येत्या २०२७ पर्यंत हे मिशन यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टिने विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड ही संस्था इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (आयजीएमसी), नागपूर यांना मदत करत आहे. डब्ल्युसीएल या संस्थेच्या माध्यमातून आयजीएमसी, नागपूर यांनी गेल्या वर्षभरात साधारण चार हजार मोतीबिंदूच्या शस्त्रक्रीया केल्या आहेत. तसेच शासनासोबत केलेल्या कराराच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन स्वप्नपूर्तीसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने संपूर्ण विदर्भात विविध उपक्रम राबवून यापुढील तीन वर्षात दरवर्षी साधारण चार हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठीदेखील ही संस्था सहकार्य करणार आहे.

ही संस्था विदर्भातील ग्रामीण भागामध्ये शिबिर घेऊन ज्यांना मोतीबिंदू आहे त्या रुग्णाचे निदान करून त्यांना रुग्णालयामध्ये पोहचवून त्यांच्यावर मोफत उपचार करतील. डब्ल्यूसीएल संस्थेचे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनच्या यशस्वीतेसाठी शासनाला असलेले सहकार्य पाहून इतर स्वयंसेवी संस्थादेखील या कामात पुढाकार घेतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

# नवी मुंबईतील भाजपच्या मंडळ नियुक्त्या जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

जिल्ह्यातील भाजपच्या दोन्ही मतदार संघातील मंडळ अध्यक्षांची निवड करण्यात आली. यात बेलापुर विधानसभा क्षेत्रात आमदार मंदा म्हात्रे तर ऐरोली विधानसभा क्षेत्रात वनमंत्री गणेश नाईक समर्थकांची वर्णी लागली. रितसर निवडणुका घेत ही निवड करण्यात आली. आगामी काळात जिल्हाध्यक्ष तसेच महिला जिल्हाध्यक्षांचीदेखील निवड पक्षीय निवडणुकीद्वारे केली जाणार आहे. बेलापुर येथे मंडळ अध्यक्षांची बैठक झाली.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत ज्येष्ठ कार्यकर्ता गोपाळराव गायकवाड, मनोहर बाविस्कर, प्रमोद जोशी, विजय घाटे, राजेश राय, प्रभाकर कांबळे, प्रताप भोस्कर, दर्शन भारदवाज, मनी कोणार, संजय ओबेरॉय, अजय पासवान, जयसिंग पवार, किरण वर्मा, अजय वर्मा, मंगेश चव्हाण, भाऊ भापकर व असंख्य कार्यकर्ते तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

त्याग, समर्पण व सेवा भावनेतून अंत्योदय व सक्षम राष्ट्र निर्मितीच्या कार्यासाठी कटिबद्ध असलेला जगातील सर्वात मोठा पक्ष भारतीय जनता पक्ष ओळखला जातो. संघटन बांधणी ही भाजपची ताकद आहे. स्थानिक पातळी पासून ते केंद्र नेत्यांपर्यंत लोकशाही पद्धतीने पक्षीय निवडणुका घेत पदाधिकाऱ्यांची निवड करत नेमणूका केल्या जातात. त्यामुळे पदाधिकाऱ्यांनादेखील पक्षात आपले स्थान मिळविण्यासाठी सामाजिक कामे करून सिद्ध करावे लागते. यासह पदाधिकाऱ्यांचे शिक्षण, त्यांचे बौद्धिक चातुर्य, कर्तृत्व पाहूनदेखील वरिष्ठ पातळीवर पदोन्नती या पक्षात देण्यात येते.




### हे आहेत मंडळ अध्यक्ष

*बेलापूर अजय सिंग, नेरूळ (पूर्व) कुणाल महाडिक, नेरूळ पश्चिम भास्कर यमगर, सानपाडा सुनील कुरकुटे तर तुर्भे पंकज आंबेरकर व वाशी विकास सोरटे यांची मंडळ अध्यक्ष म्हणून निवड भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत नरीमन पॉइंट येथील भारतीय जनता पक्ष कार्यालयात करण्यात आली.*

### जिल्हाध्यक्ष पदासाठी अनेकांची नावे चर्चेत

*नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्षपदी रामचंद्र घरत आहेत. माजी जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी पक्षाला रामराम केला होता. यामुळे जिल्हा कमिटी बरखास्त झाली होती. विधानसभा निवडणुका असल्याने त्यावेळी भाजपने नेतृत्वाने तातडीने रामचंद्र घरत यांना प्रभारी जिल्हाध्यक्ष म्हणून नेमले होते. त्यामुळे यंदा नव्याने जिल्हाध्यक्ष पदाच्या चर्चेत माजी नगरसेवक दीपक पवार, डॉ. राजेश पाटील, माजी महापौर जे डी सुतार, उपमहापौर अनिल कौशिक, सतीश निकम, दत्ता घंगाळे, निलेश म्हात्रे, माजी नगरसेवक अनंत सुतार, माजी नगरसेवक राजू शिंदे यांची नावे चर्चेत आहेत.*

### महिला जिल्हाध्यक्ष पदासाठीही अनेक इच्छुक

*माजी नगरसेविका अनिता शेट्टी, माजी नगरसेविका नेत्रा शिर्के, सुहासिनी नायडू, माजी नगरसेविका शुभांगी पाटील, माजी नगरसेविका माधवी शिंदे, ज्योती पाटील, किरण वर्मा यांची नावे चर्चेत आहेत.*

## एआयबीईए बँक संघटनेच्या स्थापना दिनी अन्नदान



**मुंबई : प्रतिनिधी**

बँकिंग उद्योगातील बहुसंख्य असलेल्या ए.आय.बी.ई.ए. संघटनेने आपला ८० वा स्थापना दिन २० एप्रिल २०२५ रोजी श्री गाडगे महाराज धर्मशाळा, मुंबई येथे रुग्णांना अन्नदान देऊन साजरा केला.

या वेळी बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन, मुंबईचे अध्यक्ष, अरविंद मोरे, जनरल सेक्रेटरी, सुधीर पाटील, संघटन सचिव, पांडुरंग भोगले, कमलेश सराफ, दिशा घाग, अमिता शेणोलीकर व श्री गाडगे महाराज धर्मशाळेचे, विश्वस्त, मा. अमोल एकनाथ ठाकूर जी, पदाधिकारी व रुग्ण उपस्थित होते.

संघटनेचे जनरल सेक्रेटरी, सुधीर पाटील यांनी श्री गाडगे महाराज धर्मशाळेचे, विश्वस्त, मा. अमोल एकनाथ ठाकूर यांना अन्नदानाचा चेक सुपूर्द केला. संघटनेच्या वतीने श्री गाडगे महाराज धर्मशाळेचे, विश्वस्त, मा. अमोल एकनाथ ठाकूर यांचा स्मृती चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

## भाजप रोहा तालुकाध्यक्षपदी अमित घाग यांची फेरनियुक्ती

**धाटाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या रोहा तालुका श्रीवर्धन मतदार संघ तालुका अध्यक्षपदी निवडीसाठी आज रोहा शासकीय विश्रामगृहात भाजप कार्यकर्त्यांची बैठक रविवारी (दि.२०) आयोजित करण्यात आली होती. तर या वेळी निवडणूक अधिकारी वैकुंठ पाटील यांच्या उपस्थितीत सर्व तालुक्यातील महत्त्वाचे पदाधिकारी समवेत निवडणूक प्रक्रिया पार पडली, तर दुसऱ्यांदा रोहा तालुका भाजपा अध्यक्षपदी अमित घाग यांची निवड करण्यात आली. त्या निवडीबद्दल तालुक्यातील कला क्रीडा सांस्कृतिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी वैकुंठ पाटील यांनी सांगितले की, पक्षाचे रचनेनुसार तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी याचे मत अजमावून चार ते पाच बैठक घेण्यात आल्या यामधील प्रत्येकाचा अभिप्राय सेल करून प्रदेश कार्यालयात पाठवण्यात आलेला होता. त्यामुळे सर्व पदाधिकारी यांच्या समवेत आज प्रदेश कार्यालयातून आलेल्या घोषणेनुसार अमित घाग यांची पुन्हा निवड करण्यात आलेले आहे, असे निवडणूक अधिकारी वैकुंठ पाटील यांनी सांगितले.

या वेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांभेकर, पिव्ही सनल कुमार, शिवाजी जाधव, मेघना ओक, जयश्री भांड , यज्ञेश भांड, श्रद्धा घाग, कृष्णा बामणे, रोशन चाफेकर, राजेश डाके, नरेश कोकरे, अरुण वाघमारे, वैभव कुलकर्णी, रिया कासार, निलेश धुमाळ यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजप दक्षिण रायगड जिल्ह्यातील १२ मंडल अध्यक्षांची नियुक्ती

**अलिबाग : प्रतिनिधी**

भाजप दक्षिण रायगड जिल्ह्यातील १२ मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात तरुणांना संधी देण्यात आली आहे, अशी माहिती भाजप रायगड लोकसभा मतदारसंघ प्रमुख सतीश धारप यांनी रविवारी (दि.२०) अलिबाग येथील भाजप कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

भाजप दक्षिण रायगड जिल्हयातील ११ तालुके आहेत. त्यातून १७ मंडल तयार करण्यात आले आहेत. १७ पैकी १२ मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे.



तरुण नेतृत्वाला संधी देण्यात आली आहे. यात नवीन जुने अस काही नाही. जो कार्यक्षम आहे त्याला संधी देण्यात आली आहे. उर्वारीत पाच मंडल अध्यक्षांची नियुक्ती येत्या आठ दिवसांत करण्यात येईल, अशी माहिती सतीश धारप यांनी यावेळी दिली.

महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार नुकत्याच पार पडणाऱ्या संघटन पर्व अंतर्गत खालील मंडल अध्यक्षांची निवड झाली. दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशिल पाटील यांनी २० एपिल रोजी ही नावे जाहिर केली, असे धारप यांनी सांगितले.

निलेश तळवटकर (महाड दक्षिण), निलेश देवगिरकर(महाड उत्तर), युवराज मुंढे (निजामपूर) शैलेश काते (मुरुड), महेश पाटील(म्हसळा), रितेश रवींद्र मुंडे (तळा), परेश सांगळे (माणगाव), अमित घाग (रोहा), संजय डंगर(पेण) श्रीकांत ठोंबरे (सुधागड), विजय भानुदास पाटील (हमरापूर), महेश ठाकूर (नागोठणे) या मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आली.

रायगड लोकसभा मतदारसंघ प्रमुख सतीश धारप, भाजप ज्येष्ठ नेते गिरिश तुळपुळे, जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेशजी थोरे, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, सोपान जांबेकर, मंगेश दळवी, सुनील दामले आदी या वेळी उपस्थित होते.

## म्हसळा तालुका भाजप अध्यक्षपदी महेश पाटील यांची एकमताने निवड

**म्हसळा : प्रतिनिधी**

भाजपच्या म्हसळा तालुका अध्यक्षपदी निवडीसाठी म्हसळा येथील शासकीय विश्रामगृह येथे भाजप कार्यकर्त्यांची बैठक झाली. या वेळी पक्षाचे धोरणानुसार महेश पाटील यांची म्हसळा तालुका अध्यक्ष म्हणून निवड झाली.

म्हसळा येथील शासकीय विश्रामगृह येथे नव्या तालुकाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमा झाले होते. रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या उपस्थित निवड संपन्न झाली. या वेळी माजी तालुका अध्यक्ष तुकाराम पाटील, ज्येष्ठ नेते शैलेश पटेल, भालचंद्र करडे, अल्पसंख्याक अध्यक्ष समीर धनसे, रमेश पोटले, महिला आघाडीच्या सुनंदा पाटील, अपर्णा ओक, रेखा धारिया, लहू तुरे, योगेश महागावकर आणी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

निवडीनंतर महेश पाटील यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले, पक्ष संघटना बळकट करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहचविणे आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर सक्रियपणे आवाज उठवणे, हेच पक्षाचे मुख्य ध्येय राहील, असे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. भाजपच्या जिल्हाध्यक्षांसह अनेक वरिष्ठ नेत्यांनी पाटील यांचे अभिनंदन करत आगामी काळात त्यांच्याकडून उत्कृष्ट नेतृत्वाची अपेक्षा व्यक्त केली आहे.



पान १ वरुन

## भाजप संघटन पर्व : पनवेल, उरण मतदारसंघातील मंडळ अध्यक्षांची नियुक्ती

या बैठकीस भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, पद्माकर पाटील, चिटणीस यतीन पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, सुनील पाटील, जनार्दन पाटील, सदाशेठ पाटील, पाली देवद अध्यक्ष किशोर सुरते, आकुर्लीचे सरपंच सचिन पाटील, विचुंबेचे सरपंच प्रमोद भिंगारकर, सुकापूरच्या सरपंच योगिता पाटील, ज्ञानेश्वर पाटील, महेश पाटील, रमेश पाटील, राजेश पाटील, उदय म्हस्कर, धनंजय पाटील, राजेश भोईर, विश्वजित पाटील, मुकेश फडके, राजेश काथारा, प्रवीण म्हात्रे, गुरूनाथ भोईर, दिनेश पाटील, दिव्येश भगत, हनुमंत खुटले आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी नवनियुक्त नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

नावडे कॉलनी येथे झालेल्या बैठकीत तळोजा मंडळ अध्यक्षपदी दिनेश खानावकर यांची नियुक्ती करण्यात आली. या बैठकीस तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, मन्सूर पटेल, सुरेशशेठ खानावकर, भूपेंद्र पाटील, नंदू म्हात्रे, नितेश पाटील, अरविंद गोंधळी, रवींद्र खानावकर, कृष्णाशेठ पाटील, नंदू भोपी, दीपक उलवेकर, अंकुश पाटील, नितीन पाटील, मदन खानवकर, सचिन पाटील, सचिन वास्कर, जयदास तेलवणे, शुभम खानावकर, राजेश पाटील, शंकर वगरे, आनंद सोनवणे, प्रताप चव्हाण, भूपेश खानावकर, लक्ष्मण खानावकर, राम खानावकर, राजेश खानावकर, अरविंद खानावकर, प्रीतम म्हात्रे, अजित म्हात्रे, रामबुवा कुडाळकर, शुभ पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी नवनियुक्त तळोजा मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

भाजप पनवेल शहर अध्यक्षपदी युवा नेते सुमित झुंझारराव यांची नियुक्ती जाहीर झाली आहे. कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील आणि भाजप पनवेल शहर मावळते अध्यक्ष अनिल भगत यांनी झुंझारराव यांचे अभिनंदन केले.

पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, चिटणीस अमरीश मोकल, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, प्रभाकर बहिरा, अजय बहिरा, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, अमित ओझे, श्रीनंद पटवर्धन, उल्हास झुंझारराव, उमेश इनामदार, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, रोहित जगताप, अभिषेक भोपी, गौरव कांडपिळे, अभिषेक पटवर्धन, पवन सोनी, प्रतिक बहिरा, सपना पाटील, प्रीतम म्हात्रे, रूपेश नागवेकर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी नवनियुक्त पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## भूतान येथे रंगले आंतरराष्ट्रीय आगरी साहित्य संमेलन


**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

साहित्य चळवळीत आगरी साहित्यिकांचंही फार मोठं योगदान असून या समाजातील ३०० हुन अधिक साहित्यिकांनी आजतागायत या साहित्य चळवळीला १ हजारहून अधिक पुस्तके दिलेली आहेत.

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. सदानंद पाटील या आगरी समाजातील एकट्या साहित्यिकाची ११० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. यावरुन या समाजातील साहित्यिकांचा आवाका किती मोठा आहे याची प्रचिती येते. असे असले तरी या समाजातील साहित्यिकांना आज अनेक समस्यांना सामोरी जावे लागत आहे. म्हणूनच या सर्व प्रश्नांना प्रामाणिकपणे उत्तरे शोधायची असतील तर सर्व आगरी साहित्यिकांना सोबत घेऊन जाणारी एखादी पालक संघटना असणे गरजेचे असल्याचे मत अमृत पाटील नेरुळकर यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय साहित्य संस्थेचे तिसरे आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलन फुंतशोलिंग भूतान येथे उत्साहात झाले. या वेळी संमेलनाध्यक्ष म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष कैलास पिंगळे, कार्यक्रमाच्या उद्घाटक साहित्यिका स्मिता वाजेकर, स्वागताध्यक्ष साहित्यिक गजानन म्हात्रे, ज्येष्ठ साहित्यिक दिनानाथ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

भूतानमधील फुंतशोलिंग येथे संपन्न झालेल्या या एक दिवसीय साहित्य संमेलनात आगरी बोली भाषेवर परिसंवाद, साहित्यिक चर्चा, कवी संमेलन, पुस्तक प्रकाशन, पुरस्कार वितरण व संगीतमय कवितेचा जागर असे अनेक कार्यक्रम झाले. यात दिनानाथ पाटील, चारुशीला म्हात्रे, रेखा थळे, शोभा पाटील, अनिल ठाकूर, दिलीप पाटील, शुभदा पाटील, गजानन म्हात्रे, स्मिता वाजेकर, कैलास पिंगळे आदी साहित्यिकांनी सहभाग घेतला.



या वेळी पहिल्या सत्रात गजानन धर्मा म्हात्रे लिखित कहर, अमृत पाटील नेरुळकर लिखित बोसका, अनिल ठाकूर लिखित बाबा अशा तीन काव्यसंग्रहांचे प्रकाशन झाले. तर दुसऱ्या सत्रात कैलास पिंगळे लिखित फसकी कादंबरीस परेन जांभळे राज्य पुरस्कार, अमृत पाटील नेरुळकर लिखित इतिहास नवी मुंबईचा या ऐतिहासिक पुस्तकास शंकर सखाराम राज्य पुरस्कार, स्मिता वाजेकर लिखित वास्तव कथा संग्रहास डॉ. गंगाधर पाटील राज्य पुरस्कार, गजानन धर्मा म्हात्रे लिखित विमानतळ : एक संघर्ष या कादंबरीस प्रा. एम. पी. पाटील राज्य पुरस्कार, अनिल ठाकूर लिखित बाबा काव्यसंग्रहास डॉ. म. सु. पाटील राज्य पुरस्कार, नरेश पाटील लिखित आगरी कोळी संस्कृती या पुस्तकास म. ना. पाटील राज्य पुरस्कार मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले.

जुन्या जाणत्या साहित्यिकांचा यथोचित सन्मान व्हावा, नवोदित साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ मिळावे व आगरी बोली भाषेचा सर्वदूर प्रचार व प्रसार व्हावा याच जाणिवेने परदेशात या आगरी अस्मिता साहित्य संमेलनाचे आयोजन केले असल्याचे स्वागताध्यक्ष कैलास पिंगळे यांनी या वेळी सांगितले.

# दास्तान फाटा येथे भाजप संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटनेचे कार्यालय सुरू

- आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उद्घाटन
- चालकांना वैद्यकीय सुविधा देणारे केंद्र



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

भारतीय जनता पक्षाच्या संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटनेच्या कार्यालयाचे रविवारी दास्तानफाटा येथे उदघाटन करण्यात आले. या कार्यालयाचे उद्घाटन उरणचे आमदार महेश बालदी यांच्याहस्ते करण्यात आले. संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटनेचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस हरप्रित सिंग माणिकताला यांनी या कार्यालयात येथील वाहन चालकांना वैद्यकीय सुविधा देण्यासाठी कायमस्वरूपी आरोग्य चिकित्सा केंद्र सुरू केले आहे.

या वेळी माजी खासदार अमर साबळे, संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटनेचे अध्यक्ष निर्गुण कवळे, प्रीती नायर, भाजप तालुका अध्यक्ष रवी भोईर, जग्गी पाटील, महेश कडू सामाजिक कार्यकर्ते स्वराज सिंग आदीजण उपस्थित होते. वाहनचालकांना विविध प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटना काम करीत आहे. यात त्यांच्याकडून वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहे. याची वाहनचालकांना आवश्यकता आहे. त्यासाठी लागले ते योगदान देण्यास आपण तयार आहोत, असे मत आमदार महेश बालदी यांनी व्यक्त केले.

वाहनचालकांना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी हे मध्यवर्ती कार्यालय सतर्क असेल असे मत संघटनेचे सरचिटणीस हरप्रित सिंग यांनी व्यक्त केले. जेएनपीटी बंदरामुळे जासई आणि उरण हे वाहतुकीचे मुख्य ठिकाण बनले आहे. या परिसरात देशभरातून येणाऱ्या वाहनचालक आणि त्यांच्या सहायकांना मदत उपलब्ध असणार आहे. या कार्यालयात विविध उपक्रम ही राबविण्याचा मानस या वेळी व्यक्त करण्यात आला आहे.

# द्रोणागिरी नोड कोस्टल मार्गावर डागडुजी करण्याची मागणी

## सततच्या अवजड वाहतुकीमुळे अपघातास निमंत्रण



### भेंडखळ गावाजवळ अपघात

***नवीनशेवा येथील जेएनपीएमधील निवृत्त कामगार नारायण भोईर हे आपल्या दुचाकीवरून घरी परतत होते. त्याच वेळी कंटेनर वाहनाने धडक दिल्याने अपघात होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर ग्रामस्थांनी रास्ता रोको करून या अपघाताचा निषेध केला.***

**उरण : प्रतिनिधी**

औद्योगिक परिसर असलेल्या सिडकोच्या द्रोणागिरी नोडमधील कोस्टल मार्गांवरील खोपटापूल-बामर लॉरी दरम्याच्या चौकात मोठमोठे खड्डे पडले आहेत. या मार्गावरून हजारोंच्या संख्येने जड कंटेनर वाहनांची वाहतूक होत आहे. या सततच्या अवजड वाहनांमुळे अपघाताला निमंत्रण मिळत आहे. त्यामुळे या मार्गावरील खड्डे बुजवून रस्ता डागडुजी करण्यात यावा, अशी मागणी प्रवासी वर्ग करीत आहे.

येथील एल अ‍ॅण्ड टी, मर्क्स चौक, शेमटीखार रेल्वे स्थानक मार्ग या मार्गांवर दीड ते दोन फुटांचे खोल खड्डे पडल्याने ही अपघाताची ठिकाणे दूर करण्यासाठी या मार्गांची लवकरात लवकर दुरुस्ती करण्याची मागणी वाहनचालक आणि नागरिकांनी केली आहे.

जेएनपीटी बंदरावर आधारित उद्योगासाठी सिडकोने धुतुम, पागोटे, नवघर, भेंडखळ या भागांत मोठमोठे कंटेनर गोदाम आहेत. या गोदामात बंदरातून आयात निर्याय होणाऱ्या मालाची साठवणूक आणि ने-आण सुरू असते. त्यासाठी या परिसरातून दररोज हजारो अवजड कंटेनर वाहने प्रवास करीत आहेत. त्यामुळे या मार्गावर खड्डे पडल्याने धोकादायक प्रवास सुरू आहे.

याच मार्गाच्या दोन्ही बाजूने जड वाहने उभी केली जात आहेत. दाटीवाटीच्या मार्गातून जड वाहनांची वाहतूक सुरू आहे. याच मार्गावर अनेकदा खड्डे आणि जड वाहनांच्या धडकेत या परिसरात नोकरी-व्यवसाय करणाऱ्या कामगारांना आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे द्रोणागिरी नोडमधील खड्डे दुरुस्तीची मागणी केली जात आहे.

# भाजप कळंबोली मंडळ अध्यक्षपदी अमर पाटील

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भाजपाच्या संघटनात्मक निवडणुकीमध्ये सर्व प्रक्रिया पार पडली. कळंबोली मंडळाच्या अध्यक्षपदी माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांची निवड करण्यात आली. अमर पाटील यांची निवड होताच सर्व कार्यकर्त्यांनी जल्लोष व्यक्त केला.

या वेळी मावळते अध्यक्ष रविनाथ पाटील, मंडळ निवडणूक प्रमुख रमेश मुंडे, माजी नगरसेवक बबन मुकादम, भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, मंडळ सरचिटणीस दिलीप बीस्ट, अमर ठाकूर, महिला मोर्चा अध्यक्षा मनीषा निकम, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक आदी पदाधिकारी उपस्थित होते.



अमर पाटील यांना शुभेच्छा देताना रविनाथ पाटील यांनी सर्व कार्यकर्त्यांना संबोधित केले की, जसं मला सहकार्य केले तसेच आपण नवीन अध्यक्षांना सहकार्य करून पक्ष वाढीसाठी काम करावे. बबन बारगजे यांनी शुभेच्छा देताना असे सांगितले की, भारतीय जनता पक्ष हा एक असा पक्ष आहे की जिथे लोकशाही आहे व लोकशाही मार्गाने सर्व अध्यक्षांची निवड होत असते तसेच येथे वैयक्तिक स्वार्थापेक्षा पक्षाला प्राधान्य दिले जाते.

भाजपने पक्षात सर्व नव तरुणांना संधी दिलेली आहे त्यामुळे सर्वांनी एकमेकांनी हातात हात घालून काम करावे. त्यावेळी बबन मुकादम यांनीही मनोगत व्यक्त केले व आभार प्रदर्शन दिलीप बिस्ट यांनी केले. नवनिर्वाचित अध्यक्ष अमर पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लोकनेते रामशेठ ठाकूर आमदार प्रशांत ठाकूर जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व सर्व पक्ष नेतृत्वाचे आभार मानले व पक्षाने जी जबाबदारी दिली आहे ती मी प्रामाणिकपणे पार पाडेन, असे आश्वासन दिले.

# कै. अंबालाल पटेल यांची प्रार्थना सभा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय किसान संघाचे संस्थापक अंबालाल पटेल यांचे धाकटे पुत्र आणि भाजपचे रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांच्या हस्ते रविवारी (दि.२०) खारघर येथील रामशेठ ठाकूर शाळेच्या सभागृहात प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रार्थना सभेत पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, खारघरमधील विविध समाजातील मान्यवर उपस्थित होते व त्यांनी अंबालाल यांना आदरांजली वाहिली.



या वेळी कच्छ कडवा पाटीदार समाजाचे सल्लागार बिपीन पटेल, कडवा पाटीदार समाजाचे माजी अध्यक्ष मणिबापा, ट्रस्टी नरशी पटेल, समाजचे उपाध्यक्ष सुरेश नाकराणी, ईश्वर रामजियानी, प्रवीणभाई धोळू, कच्छ कडवा पाटीदार समाजाच्या युवक मंडलचे अध्यक्ष राजेश छाभैया, मंत्री हसमुख दडगा, भाजपचे अध्यक्ष नगरसेवक प्रवीण पाटील, नगरसेवक किरण पाटील, नगरसेवक हरेश केणी, नगरसेवक नरेश ठाकूर, नगरसेवक गुरुनाथ गायकर, भाजपा खारघर मंडळाचे सरचिटणीस दीपक शिंदेजी, दिलीप जाधवजी, भरत कोंढाळकरजी, खारघर भाजप युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, संजय जैन, बिना गोगरी, अंजुबेन पटेल, माहेश्वरी समाज खारघर हे डॉ.राकेश सोमाणी, खारघर कच्छ वागड लेवा पाटीदार समाजाचे जिवाभाई रावत, प्रविण वाविया, सौराष्ट्र लेवा पाटीदार समाजाचे कृणाल सांगानी, हितेश गढिया, रमेशभाई सोरठिया, बीएपीएस स्वामीनारायण संप्रदायाचे हितेशभाई, मनेश मांगुकिया, विपुलभाई चोटलिया, जैन समाजाचे प्रतिनिधी, अखिल भारती गायत्री परिवार खारघरचे प्रतिनिधी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमोद पांडे, ज्ञानेश्वर खरपुर्याजी, संजय शर्मा, परीक्षित गजेरा, राजेश भानुशाली, अखिल भारती गायत्री परिवाराचे प्रतिनिधी उपस्थित होते. हिंदू जागरण मंचचे शिवम सिंगजी, गायत्री खडवडकरजी उपस्थित होते आणि त्यांनी श्रद्धांजली वाहिली.

# रांजणपाडा रंगभूमीत आगरी पेठा नाटकाचा प्रयोग

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील रांजणपाडा येथील अष्टगंध कलामंच्याच्या वतीने मरूआईच्या यात्रेनिमित्त आणि बबीबाई त्रिंबक पाटील यांच्या स्मृतिप्रत्यर्थ शुक्रवार (दि.१८) एप्रिल रोजी रात्री दहा वाजता आगरी पेठा या दोन अंकी नाटकाचा प्रयोग रांजणपाडा येथील हनुमान मंदिराच्या भव्य पटांगणात सादर करण्यात आला.



या वेळी व्यासपीठावर नाटकाचे लेखक रंजन ठाकूर, रमाकांत म्हात्रे, नरेंद्र ठाकूर, वामन कोळी, विनोद कोळी, जयेश म्हात्रे, रामनाथ कोळी, कैलास राजे घरत आदी उपस्थित होते. या वेळी अध्यक्ष अशोक म्हात्रे सचिव दत्तात्रेय घरत, मार्गदर्शक हसूराम पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. २२ वर्षांनंतर पुन्हा एकदा आगरी पेठा हे नाटक प्रेक्षकांच्या आग्रहाखातर रंगमंचावर आणले गेले.

या नाटकाचे लेखन रंजन ठाकूर, दिग्दर्शन नाटककार धनेश्वर म्हात्रे व प्रसाद कडू यांचे आहे. नाटकाची संकल्पना अष्टगंध कलामंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे सचिव दत्तात्रेय घरत, नाटककार हसुराम पाटील, दिगंबर कोळी, चेतन पाटील यांची आहे. आगरी संस्कृती, आगरी भाषेतील गोडवा, आगरी रूढी परंपरा व नातेसंबंधाच्या वास्तवावर चर्चा करायला लावणारे हे नाटक रसिकांना खूप भावले. अशोक म्हात्रे, दत्तात्रेय घरत, प्रज्योत पाटील, जयकिसन मोकल, अनमोल कोळी, समीर कोळी रमेश कोळी तसेच अन्य कार्यकर्त्यांनी हा प्रयोग यशस्वी करण्याच्या दृष्टीने जबाबदारीने काम केले.

नाटकात आघाडीचे कलाकार हसूराम पाटील, निकिता पाटील, वैशाली मोहिते, कृष्णकांत म्हात्रे, चेतन पाटील, अशोक म्हात्रे, दिगंबर कोळी, योगेश ठाकूर, रुचिता म्हात्रे, परेशा सरोदे, ममता मॅडम, प्रसाद कडू, रोशन घरत, अलंकार कडू या सर्व कलाकारांनी आपापल्या भूमिकांना न्याय दिला. आनंद कुबल यांचे प्रासंगिक संगीत तर राजेंद्र जोशी यांची प्रकाशयोजना साजेशी ठरली.





**पनवेल :** सुकापूरच्या सरपंच योगिता राजेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, सुकापूर गाव अध्यक्ष राजेश पाटील, हभप पद्माकर भुवा पाटील, किशोर सुरते, यतिन पाटील, ग्रामपंचायत सदस्या प्राची जाधव आदी उपस्थित होते. सर्वांनी योगिता पाटील यांचे अभिष्टचिंतन केले.

# ताडगोळे खरेदीकडे नागरिकांची ओढ

**उरण : प्रतिनिधी**

प्रचंड तापमानामुळे अंगाची काहिली होऊन घामाच्या धारा वाहू लागल्या आहेत. ही काहिली शमवून थंडावा मिळण्यासाठी ताडगोळे खरेदीसाठी उरणकर गर्दी करीत आहेत. सध्या उरणच्या बाजारपेठेत पालघर जिल्ह्यातून ताडगोळे विक्रीसाठी दाखल झाले असून त्याचा दर १५० रुपये प्रति डझन आहे.

फेब्रुवारी महिन्यापासून उरणच्या बाजारात ताडगोळे विक्रीसाठी येऊ लागले आहेत. सुरुवातीपासूनच उरणमध्ये प्रति डझन १५० रुपये दर आकारला जात आहे. साधारणपणे प्रति डझन १०० रुपये किंवा त्यापेक्षा कमी दरात मिळणाऱ्या ताडगोळ्यांच्या दारात वाढ झाल्याने नागरिकांनी खरेदी करताना हात आखडता घेतला आहे, मात्र आवक वाढल्यानंतर दरात घट होईल, अशी माहिती ताडगोळे विक्रेत्यांनी दिली.

उरणच्या समुद्रकिनाऱ्यावर ताडाची झाडे आहेत. या झाडांच्या माध्यमातून ताडी व ताडगोळे यांची विक्री केली जाते, मात्र सध्या या परिसरातील ताडाच्या झाडांची संख्या घटली आहे. तर या उंच झाडांवर चढून ताडगोळे काढण्याचे धोकादायक आणि जिकिरीचे काम करणाऱ्या व्यक्ती उपलब्ध होत नाहीत. उपलब्ध झाले तर त्यांचे दर परवडत नसल्याची माहिती ताडगोळे विक्रेत्यांनी दिली.



उन्हाळ्यात बाहेरील वातावरणाने शरीराचे तपमान वाढते हे तापमान कमी करण्यासाठी ताडगोळे हे फळ महत्त्वाचे काम करते त्यामुळे या फळाला अधिकची मागणी असते, मात्र स्थानिक ताडगोळ्यांबरोबरच सध्या बोकडवीरा उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमाणात पालघर जिल्ह्यातील ताडगोळ्यांची विक्री केली जात आहे. ग्राहकांना जागेवर ताजे ताडगोळे काढून तातडीने दिले जात असल्याने या ताडगोळ्यांसाठी ग्राहकांकडून गर्दी केली जात आहे.

उरण तालुक्यातील ताडाच्या झाडांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे. त्यामुळे पालघर येथून उरणच्या बाजारात आणण्यात आलेल्या ताडगोळ्यांना उरण शहरात मोठ्ठी मागणी आहे.

# पनवेल बाजारपेठेत रानमेवा मोठ्या प्रमाणात विक्रीला

**पनवेल : वार्ताहर**

ऐन उन्हाळ्यात हवाहवासा वाटणाराआणि लांबून पाहूनच तोंडाला पाणी सुटेल इतका चविष्ट असणारा रानमेवा सध्या पनवेल परिसरातील बाजारात दाखल झाला आहे.

छोटा आवळा, बोरे, तोतापुरी कैरी, जांभूळ, करवंद, ताडगोळे, फणस गरे, पिवळा रानमेवा असा रानमेवा भरलेल्या टोपल्या पनवेल परिसरातील ठिकठिकाणी नजरेस पडत आहेत. यातील ताडगोळे, करवंदे, जांभूळ, पिवळा रानमेवा यांना सध्या जास्त मागणी असल्याने त्यांचे भावही दरवर्षीप्रमाणे चढेच असल्याचे रानमेवा विक्रेत्यांकडून सांगितले जाते.

पनवेल परिसरातील रस्त्याच्या कडेला, गावागावातील बाजारात विकण्यासाठी आलेला आंबट, गोड, तुरट रानमेवा खाण्यासाठी पनवेलकरांची



झुंबड उडत आहे. उन्हाळा म्हटल्यावर नारळ, आंबा, फणस या पलिकडचा रानमेवा कुणाला दिसत नाही. पण बोरे, रानजांभळे, आवळा, चिंच, पिवळा रानमेवा, ताडगोळे, करवंदे या अस्सल मेव्याने पनवेल येथील बाजारात हजेरी लावल्याने बाजारात घमघमाट सुटत असल्याचे चित्र दिसत आहे. या रानमेव्यातील प्रत्येक फळाचे स्वतःचे वेगळे वैशिष्ट्यही आहे.

रानमेवा गुणकारी असण्यासह त्याची चवही मनाला तृप्त करणारी आहे.

# वाढत्या उकाड्यात कूलर आणि फ्रीज घेण्याकडे नागरिकांचा वाढता कल

**पनवेल : वार्ताहर**

एप्रिल महिना मध्यावर आला असून, कडक उकाडा जाणवू लागला आहे. त्यामुळे पनवेलकरांचा एसी, कूलर आणि फ्रीज घेण्याकडे वाढला आहे. गेल्या काही दिवसांपासून कडकडीत उन्हाळा सुरू झाला आहे. त्यामुळे पनवेलचा पारा ३८ ते ४० अंशांपर्यंत पोहचला आहे, परिणामी पनवेलकरांची पावले एसी, कूलर आणि फ्रीज अशा वस्तू घेण्याकडे वळू लागली आहेत.

उन्हापासून दिलासा मिळावा, या हेतूने पानवेलकरांच्या या वस्तूंच्या खरेदीसाठी दुकानात गर्दी करू लागले आहेत. यामुळे एसी, पंखे, कूलर, फ्रीज या वस्तूंची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ही वाढती मागणी लक्षात घेऊन, दुकानदारांनीही ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी जाहिरात शिवाय इतर युक्त्या वापरून या साधनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न चालवला आहे. सध्या बाजारात पंख्यांना असलेली मागणी कमी झाली असून, ग्राहकांचा ओढा एसी आणि कूलर घेण्याकडेच जास्त आहे. तर सामान्य नागरिकांना एसीची खरेदी आवाक्याबाहेरची वाटत असल्याने त्यांनी कुलरला पसंती दिल्याचे दिसून येत आहे.



दररोज ६ ते ७ कूलर व ३ ते ४ एसी विक्रीला जात असल्याची माहिती येथील विक्रेत्यांनी दिली आहे, तर मोठ्या दुकानांत हेच प्रमाण २५ ते ३० कूलर व १० ते १५ एसी इतके असल्याचे सांगण्यात आले आहे. तर फ्रीजची विक्रीही मोठ्या प्रमाणात झाल्याचे व्यापारी सांगत आहेत. उन्हाचा कडाका वाढल्यामुळे रोज दुकानांमध्ये एसी व कूलर घेण्यासाठी ग्राहकांची रीघ लागत आहे.

काहीजाण है लग्नसराई सुरू असल्यामुळे एसी किया कूलर भेट देण्यासाठी खरेदी करीत असल्याचे व्यापारी सांगत आहेत. मागील वर्षे एवढीच किंमत यंदादेखील आहे. त्यामुळे या वस्तूंच्या खरेदीचे प्रमाण वाढले असल्याचे बाजारातील व्यापारी सांगत आहेत.

## संपादकीय

# महिला सक्षमीकरणास प्राधान्य

**एक स्त्री शिकली तर अख्खे कुटुंब साक्षर होते. शिक्षित महिला आपल्या कुटुंबाला योग्य मार्गदर्शन करू शकते आणि त्यांच्या जीवनात सुधारणा घडवू शकते. याचबरोबर स्त्री सक्षम झाल्यास कुटुंबाची आर्थिक घडी चांगल्या प्रकारे बसू शकते. म्हणूनच राज्य शासनाने महिला सक्षमीकरणास प्राधान्य दिले आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील महायुती सरकार महिलांच्या प्रगती व स्थैर्यासाठी कार्यरत आहे. महिलांसाठी शासनाने विविध योजना आणल्या आहेत. राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने रविवारी नागपूर येथील नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात पिंक ई-रिक्षा योजनेंतर्गत ५० पात्र महिला लाभार्थ्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पिंक ई-रिक्षा वितरित करण्यात आल्या. मुख्यमंत्र्यांनी एका लाभार्थी महिलेच्या पिंक ई-रिक्षातून प्रवास करीत महिलांना कृतिशील विश्वासही दिला. 'शासनाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने विविध निर्णय घेतले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिलांद्वारे महिलांसाठी संचालित पिंक ई-रिक्षा योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे,' असे मुख्यमंत्र्यांनी या वेळी म्हटले. महाराष्ट्र राज्याचे चौथे महिला धोरण-२०२४ जाहीर झालेले आहे. या धोरणाच्या कृती आराखड्याबरोबरच अंमलबजावणीच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी संस्थात्मक व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे. महिला सक्षमीकरण व विकास साधण्यासाठी या धोरणातील विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी त्या त्या प्राधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तशाही महिलांसाठी महायुती सरकारने विविध योजना आणलेल्या आहेत. यापैकी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना तर खूपच लोकप्रिय ठरली. या योजनेंतर्गत पात्र महिलांच्या बँक खात्यात दरमहा १५०० रुपये डीबीटीव्दारे थेट लाभ हस्तांतरीत करण्यात येतो. यामुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या हातभार मिळत असून त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण होण्याबरोबरच आरोग्य आणि पोषणातही सुधारणा होत आहे. आणखी एक बाब म्हणजे कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका अधिक मजबूत होत आहे. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी पिंक ई-रिक्षा योजनेच्या माध्यमातून महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यात येत असून यात एकल महिला, विधवा, परित्यक्तांना प्राधान्य देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत रिक्षा किमतीच्या २० टक्के रक्कम शासनाकडून देण्यात येते, तर १० टक्के रक्कम महिलांनी भरावयाची असून उर्वरित ७० टक्के रक्कम बँक कर्जाच्या माध्यमातून भरावी लागणार आहे. या योजनेमुळे महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत आहेत. याशिवाय लेक लाडकी योजनेतून मुलींना अर्थसहाय्य केले जाते. एकीकडे महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी वेळोवेळी पावले उचलली जात असताना दुसरीकडे महिलांवरील अन्याय, अत्याचार, शोषण रोखण्यासाठी तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी लक्ष देण्यात येत आहे. नराधमांना कायद्यान्वये शिक्षा देणे, कायदे कडक करणे यासाठीही सरकार दक्ष आहे. एकंदर महिलांचे कुटुंबातील तसेच समाजातील महत्त्वाचे स्थान लक्षात घेता त्यांना पाठबळ देण्याचे महायुती सरकारचे धोरण आहे. त्यामुळे महिला येत्या काळात शैक्षणिक, आर्थिक, सामाजिकदृष्ट्या सक्षम होऊन सर्वांगीण प्रगती साधतील.

# महाड-म्हाप्रळ रस्ता लवकर पूर्ण व्हावा



महाड तालुक्यातील म्हाप्रळ-पंढरपूर या मार्गावरील महाड ते महाप्रळ या टप्प्याचे काम गेले पाच वर्षांपासून सुरू आहे. ठिकठिकाणी केलेले खोदकाम आणि जुन्या मार्गावर पडलेले खड्डे यामुळे या परिसरातील नागरिक याच खराब रस्त्याचा त्रास सहन करत आहेत.

महाड तालुक्यातून म्हाप्रळपासून पंढरपूरपर्यंत जाणारा मार्ग आहे. हा मार्ग पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात होता, मात्र सध्या तो महामार्ग बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आलेला आहे. म्हाप्रळ-पंढरपूर यातील वरंधा घाट ते म्हाप्रळदरम्यान असलेला सुमारे ८२ किमीचा मार्ग महाड तालुक्यातून जातो. या रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरण कामाची निविदा सन २०१८ रोजी सुमारे २८०.४२ कोटी रुपयांची काढण्यात आली. त्यानुसार हे काम एम.बी. पाटील या ठेकेदाराला देण्यात आले, मात्र पाटील कंपनीने हे काम न केल्याने शासनाने त्यांच्याकडून ठेका काढून घेतला आणि सन २०२१मध्ये दुसरी निविदा काढली. सुमारे २०८.१० कोटी रुपयांची निविदा काढून हे काम अक्षय कंट्रक्शन आणि पीडीआयपीएल कंपन्यांना देण्यात आले. थोड्या प्रमाणात कामाला सुरुवात झालेली असतानाच निविदा प्रक्रियेतील बदलामुळे प्रत्यक्ष कामाला सन २०२१मध्ये सुरुवात झाली. तिथपासून आजतागायत या रस्त्याचे काम अद्याप सुरूच आहे.

**खबरबात**
**महेश शिंदे**

सध्या महाड तालुक्यातील शिरगाव ते तुडील या जवळपास नऊ किमीदरम्यान संपूर्ण रस्ता खोदून ठेवण्यात आलेला आहे. या टप्प्यामध्ये एक टक्कादेखील काँक्रीटीकरण काम झालेले नाही. तुडील गावापासून पुढे साधारण दोन किमी अंतरापर्यंत अत्यंत खराब रस्त्यामुळे डांबरीकरण करण्यात आलेले आहे. पुढे रोहन गावापासून चिंभावेपर्यंतदेखील रस्त्याचे काम कमी-अधिक प्रमाणात झालेले आहे. वराठी गावापासून पुढे गोमंडीपर्यंत खडी पसरून ठेवण्यात आलेली आहे. गोमेंडी गावापासून म्हाप्रळपर्यंत एकेरी काँक्रीट काम झालेले आहे. राजेवाडी गावापासून वरंधापर्यंतदेखील अद्याप टप्प्याटप्प्यात काम सुरु आहे. तीन वर्षांपासून हे काम अशाच पद्धतीने सुरू असल्याने स्थानिक ग्रामस्थांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

म्हाप्रळ-पंढरपूर या मार्गामध्ये महाड औद्योगिक वसाहतीमधून बाहेर पडणारी सांडपाणी वाहून नेणारी जलवाहिनी आहे. या जलवाहिनीच्या स्थलांतराकरिता सुमारे १५० कोटी रुपये अपेक्षित असल्याने महामार्ग विभागाने जलवाहिनीचे स्थलांतर रद्द करून या २० किलोमीटर अंतरामध्ये डांबरीकरण करण्याचा निर्णय घेतला. काँक्रीटीकरणाचे काही टक्केच काम झालेले असताना डांबरीकरण काम मात्र अल्पावधीत पूर्ण झाले आहे, मात्र यातही वीस किमी पेक्षा कमी अंतरामध्ये डांबरीकरण झाल्याचे दिसून येत आहे.

आधुनिक यंत्रणा वापरूनदेखील महाड शिरगाव ते म्हाप्रळ या फक्त २४ किमी अंतराला पाच वर्ष लागली आहेत. अशाच पद्धतीत महाड-रायगड महामार्गदेखील रखडला आहेत. या अभियांत्रिकी शिक्षण घेऊन आलेल्या अभियंत्यांचा आणि एकाच वेळेस अनेक ठिकाणी काम घेणाऱ्या ठेकेदारांचा उपयोग काय, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे. लवकरात लवकर हे काम पूर्ण करावे.

# गणितज्ज्ञ शकुंतला देवी

शकुंतला देवी यांचा आज स्मृतिदिन. शकुंतला देवी यांना ह्यूमन कॉम्प्युटर म्हणून ओळखले जाते. त्यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९२९ रोजी बंगलोरमध्ये झाला. त्यांचे कुटुंब म्हणजे पारपंरिक कन्नड ब्राह्मण, पण शकुंतला देवी यांचे वडील नव्या युगातले. त्यांनी आपल्या भिक्षुकीच्या पारंपरिक व्यवसायाला आणि मंदिरातील परंपरागत पुजारी होण्याला नकार देऊन सर्कसमधील आडवाटेवरची नोकरी धरली.

शकुंतला देवींचे वडील सर्कसमध्ये काम करीत होते. शकुंतला तीन वर्षांच्या असताना त्यांना पत्त्यांचे खेळ शिकवताना त्यांच्या अफाट स्मरणशक्तीचे ज्ञान वडिलांना झाले. त्यांनाच शकुंतला देवी यांच्यामधील झपाट्याने गुणाकार-भागाकार करण्याच्या शक्तीची पहिल्यांदा ओळख पटली. सर्कस सोडून ते शकुंतला यांचेच रोडशो करू लागले. वयाच्या सहाव्या वर्षी शकुंतला यांनी म्हैसूर विद्यापीठात आपल्या अंकगणितीय कौशल्याचे प्रदर्शन केले.

शकुंतला देवी १९४४मध्ये लंडनला गेल्या. लंडनला गेल्यावर पुढे त्यांनी संपूर्ण जगामध्ये प्रवास केला आणि आपल्या बुद्धिमत्ता आणि गणितीय कौशल्याचे वेगवेगळे चमत्कार दाखवून त्यांनी संपूर्ण जगाला चक्रावून सोडले. १९७६मध्ये आपल्या अमेरिका दौऱ्यात त्यांनी संगणकापेक्षा अधिक वेगाने आकडेमोड पूर्ण करून त्याची उत्तरे परीक्षकांसमोर अचूक सादर केली.



१९७७मध्ये डलास विद्यापीठात शकुंतला यांचा मुकाबला तत्कालीन सर्वांत जलद कॉम्प्यूटर 'युनिव्हॅक'शी झाला. तेथे शकुंतला देवी यांनी एका २०१ अंकी संख्येचे २३वे मूळ ५० सेकंदात काढले व फळ्यावर लिहिले. हे मूळ काढायला कॉम्प्युटरला ६२ सेकंद लागले.

१८ जून १९८०मध्ये त्यांना ७६८६३६९७७४८७० आणि २४६५०९९७४५७७९ या दोन संख्या गुणाकारासाठी देण्यात आल्या. हे आकडे लंडनच्या इम्पीरियल कॉलेजच्या संगणक विभागाने निवडलेले होते. शकुंतला देवी यांनी या दोन आकड्यांचा अचूक गुणाकार करून दाखवत केवळ २८ सेकंदात उत्तर दिले. १३ आकडी दोन संख्यांचा गुणाकार त्यांनी फक्त २८ सेकंदात पूर्ण केला. त्यांच्या याच कामगिरीमुळे त्यांना ह्युमन कॉम्प्युटर म्हणून ओळखले जाऊ लागले आणि शकुंतला देवी यांचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये विराजमान झाले. शकुंतला देवी यांच्या अंगी एक अद्भूत प्रतिभा होती. अख्ख्या भारतास त्याची दखल घ्यावी लागली. गुगलने त्यांच्या पहिल्या जयंतीनिमित्त डुडल बनवून त्यांना आदरांजली वाहिली होती. भारतात परतल्यावर १९८८मध्ये त्यांना अमेरिकेतून बर्कलेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठामधील मानसशास्त्र विभागाचे विशेष आमंत्रण आले. या विभागातील प्रा. आर्थर जेनसन यांनी त्यांच्यावर संशोधन करण्यास सुरुवात केली. प्रा. आर्थर जेनसन यांनीदेखील त्यांच्यावर असंख्य प्रयोग केले. कोणत्याही अवघड बहुअंकी संख्येचे घनमूळ काढणे किंवा कोणत्याही बहुअंकी संख्येचा सातवा किवा आठवा घात काढायला सांगण्याची खोटी की, शकुंतला देवी यांचे उत्तर तयार असायचे. अशा या महान गणितज्ज्ञाचे २१ एप्रिल २०१३ रोजी निधन झाले. **(साभार इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# ॲमेझॉनचा बॅक टू स्कूल सेल; स्वस्तात वस्तू उपलब्ध

सध्या काही शाळा आणि कॉलेजमध्ये परीक्षा संपून विद्यार्थ्यांची सुट्टी सुरू झाली आहे. यादरम्यान अनेक जण वेगवेगळ्या विषयांचे कोर्स करतात. काही जण गेम्स खेळतात, काही अगदी आवडत्या विषयांचा अभ्यास, तर काही अगदी हेल्थकडे लक्ष देण्यासाठी व्यायामसुद्धा करतात. या सगळ्या गोष्टी करण्यासाठी तुम्ही लॅपटॉप, टॅबलेट, स्मार्टवॉच घेण्याचा विचार करत असाल तर ही बातमी फक्त तुमच्यासाठीच आहे.




ॲमेझॉनने उन्हाळा स्पेशल 'बॅक टू स्कूल सेल' सुरू केला आहे, ज्यामध्ये विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांनी लॅपटॉप, टॅब्लेट, प्रिंटर, हेडफोन, स्मार्टवॉच खरेदी केल्यास ८० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येणार आहे. उन्हाळ्यात तुम्ही घरी अभ्यासाची तयारी करत असाल किंवा एखाद्या वर्गाला शिकवणार असाल तर मेझॉनवरील हे डील तुमच्या सर्व शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या आवश्यक स्वस्तात विकत घेण्यास मदत करू शकते.

बजेट फ्रेंडली लॅपटॉपपासून ते शालेय प्रकल्प आणि ऑनलाइन क्लासेससाठी उपयुक्त असणाऱ्या हायपर्फोमन्स असलेल्या मशीनपर्यंत ॲमेझॉन टॉप लॅपटॉप ब्रँडवर ४० टक्क्यांपर्यंत सूट देत आहे.

प्रवासात अभ्यास करायला आवडते? तर मेझॉनच्या सेलमध्ये सॅमसंग आणि लेनोवोसारख्या लोकप्रिय ब्रँडच्या टॅब्लेटवर ४० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात आली आहे. दीर्घकाळ बॅटरी टिकणारे डिव्हाइस नोट्स लिहिण्यासाठी, वाचण्यासाठी आणि ऑनलाइन क्लासेसमध्ये सहभागी होण्यासाठी बेस्ट ठरेल.

सेलदरम्यान प्रिंटरवर ३५ टटक्क्यांपर्यंत सूट मिळवा आणि वेळ, पैसा दोन्ही वाचवा. कॉम्पॅक्ट इंकजेटपासून ते ऑल इन वन मल्टीफंक्शन प्रिंटरपर्यंत, मेझॉनच्या डीलमुळे प्रिंटिंग असाइनमेंट आणि प्रोजेक्ट्स पूर्वीपेक्षा जास्त सोप्या पद्धतीने पूर्ण करता येईल .

मेझॉनला हेडफोन्सवर ६० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात आली आहे. ऑनलाइन क्लासेस अटेंड करण्यासाठी तुम्हाला नॉइज कॅन्सलिंग, वायरलेस किंवा वायर्ड मॉडेल्स आवडत असले तरीही ॲमेझॉनवर तुम्ही वेगवेगळ्या प्रकारचे हेडफोन्स खरेदी करू शकता.

# भारतीय नागरी सेवा दिन विशेष

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी २१ एप्रिल १९४७ रोजी दिल्लीतील मेटकाफ हाऊसमध्ये नागरी सेवकांच्या पहिल्या गटाला संबोधित केले होते. त्या दिवसाची आठवण म्हणून २००६पासून हा दिवस नागरी सेवा दिन म्हणून नियमितपणे साजरा होत आहे.



**निमित्त**

दरवर्षी २१ एप्रिल रोजी भारतामध्ये नागरी सेवा दिन पाळला जातो. प्रशासकीय सेवेत स्वत:ला सार्वजनिक सेवेसाठी समर्पित असलेल्या लोकांच्या सन्मानार्थ हा दिन साजरा केला जातो. भारतीय नागरी सेवेचे दोन भाग आहेत. पहिला अखिल भारतीय सेवा. यात तीन सेवा आहेत. भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय पोलीस सेवा (आयपीएस), भारतीय वनसेवा (आयएफओए). दुसरा भाग केंद्रीय सेवा. यात गट अ व गट ब यात विभागलेल्या सुमारे १७ सेवा येतात. उदा. राजस्व सेवा, पोस्टल सेवा, माहिती सेवा, व्यापार सेवा इ. नागरी सेवा दिनाचा एक भाग म्हणून दरवर्षी पंतप्रधानांच्या हस्ते सार्वजनिक प्रशासनात उत्कृष्टतेसाठी पारितोषिके नागरी सेवकांना देण्यात येतात.

भारतीय प्रशासकीय सेवा (इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस किंवा आयएएस) ही भारत सरकारची नागरी सेवा आहे. आयएएस ही तीन अखिल भारतीय सेवांपैकी एक आहे (भारतीय पोलीस सेवा व भारतीय वन सेवा या इतर दोन सेवा आहेत). आयएएसला भारताच्या लोकप्रशासनामध्ये असाधारण महत्त्व आहे. केंद्रीय सरकारच्या व राज्य सरकारांच्या नागरी रचनेत बरीच महत्त्वाची पदे आयएएस अधिकारी सांभाळतात.

आयएएस अधिकाऱ्यांची निवड नागरी सेवा परीक्षेद्वारा (सिव्हिल सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन) केली जाते. संघ लोक सेवा आयोग (युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन) ही भारत सरकारची संविधानिक संस्था सरकारी अधिकाऱ्यांची निवड व नियुक्ती करण्यास जबाबदार आहे. आयएएस अधिकारी बनण्यासाठी इच्छुक उमेदवारांना नागरी सेवा परीक्षेचे प्राथमिक परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत हे तीन भाग पूर्ण करावे लागतात.

आयकर अधिकारी, राजदूत व परराष्ट्र सचिव, केंद्र सरकारच्या विविध खात्यांतील सल्लागार, जिल्हाधिकारी, निवडणूक अधिकारी अशी काही प्रमुख पदे आयएएस अधिकारी भूषवितात. या सेवेमध्ये रुजू होण्यासाठीची परीक्षा भारतातील केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतली जाते.

केंद्रीय लोकसेवा आयोग किंवा संघ लोकसेवा आयोग ही भारत संघ राज्याची निवड संस्था आहे. ही संस्था अखिल भारतीय सेवा तसेच संघ सेवेच्या गट 'अ' व गट 'ब' कर्मचाऱ्यांच्या निवडीकरिता जबाबदार आहे. हा आयोग 'कर्मचारी, लोक तक्रारी आणि निर्वाहभत्ता मंत्रालयातील' 'कर्मचारी आणि प्रशिक्षण विभाग' यांच्या अधिपत्याखाली येतो. हा संवैधानिक आयोग आहे.

भारत सरकार संघ सेवेतील (गट 'अ' व गट 'ब') तसेच अखिल भारतीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या नेमणूक, बदली, पदोन्नती व शिस्तीची कारवाई इ.करिता लोक सेवा आयोगाशी सल्लामसलत करते. हा आयोग थेट राष्ट्रपतींना अहवाल साधार करतो.

'लोकसेवा आयोग' या नावाने १ ऑक्टोबर १९२६ रोजी स्थापना. नंतर भारत सरकार कायदा १९३५ नुसार 'फेड्रल संघराज्य लोकसेवा आयोग' असे नामकरण आणि शेवटी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'संघलोकसेवा आयोग' असे नाव बदल झालेले आहेत.

**(साभार : इंटरनेट)**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# मेंदूचे कार्य सुधारण्यासाठी सहा उपाय ठरतील उपयुक्त

शरीराच्या इतर अवयवांप्रमाणे मेंदूला योग्य काळजी आणि व्यायामाची आवश्यकता असते. म्हणून दिल्लीतील सीके बिर्ला हॉस्पिटलमधील अंतर्गत औषधांचे प्रमुख सल्लागार डॉ. नरंदर सिंघला यांनी सांगितले की, जीवनशैलीतील बदल, मानसिक व्यायाम आणि निरोगी सवयींच्या संयोजनाद्वारे मेंदूचे कार्य सुधारता येते.



मेंदूच्या आरोग्यासाठी नियमित व्यायाम आवश्यक आहे, कारण तो रक्त प्रवाह सुधारतो, संज्ञानात्मक कार्य वाढवतो आणि न्यूरोप्लास्टीसिटीला प्रोत्साहन देतो. आठवड्यातून अनेक वेळा चालणे, सायकलिंग किंवा पोहणे यांसारख्या मध्यम-तीव्रतेचा व्यायाम किमान २०-३० मिनिटे केल्याने मेंदूची कार्यक्षमता वाढू शकते.

मानसिकदृष्ट्या सक्रिय राहणेदेखील वाचन, कोडी सोडवणे किंवा नवनवीन गोष्टी शिकणे यांसारखे क्रियाकलाप मदत करतात, ज्यामुळे वयाशी संबंधित संज्ञानात्मक घट होण्याचा धोका कमी होतो.

**मेंदूच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी हे करा**

ग्लेनीगल्स हॉस्पिटल, परळ, मुंबई येथील न्यूरोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. पंकज अग्रवाल यांनी माहिती दिली...

**रात्रीची पुरेशी झोप घ्या :** प्रत्येकाने दररोज सात-आठ तासांची झोप घेतली पाहिजे, जेणेकरून त्याचा मेंदू विश्रांती घेईल आणि तो पुन्हा स्थिर होईल.

**शारीरिकदृष्ट्या सक्रिय रहा :** नियमित व्यायाम केल्याने मेंदूमध्ये रक्त प्रवाह वाढेल आणि स्मरणशक्ती सुधारेल.

**मेंदूला चालना देणारे पदार्थ खा :** संतुलित आहार घेणे आवश्यक आहे. तुमच्या जेवणात मासे, काजू, बेरी, पालेभाज्या आणि संपूर्ण धान्ये यांचा समावेश करा. जंक, प्रक्रिया केलेले, तेलकट पदार्थ टाळा. फळं, भाज्या, संपूर्ण धान्य अशा प्रकारचा संतुलित आहार घेतल्यास मेंदूच्या आरोग्यास आवश्यक पोषक तत्वे व अँटीऑक्सिडंट्स मिळतात.

**मन सक्रिय ठेवा :** कोडी सोडवा, पुस्तके वाचा, काहीतरी नवीन शिका किंवा मेंदूचे खेळ खेळा. नवीन भाषा, नृत्य किंवा फोटोग्राफी यांसारखे नवीन कौशल्य शिकण्याचा प्रयत्न करा.

**सामाजिकदृष्ट्या जोडलेले रहा :** मित्र आणि कुटुंबाशी बोलल्याने तुमचे मन प्रसन्न राहते आणि ताण कमी होतो. तुमच्या मित्रांना तुमच्या भावना मोकळेपणाने सांगा.

**ताण कमी करा :** मेंदूचे आरोग्य वाढवण्यासाठी दीर्घ श्वास घेऊन ध्यान करणे किंवा योगासने करा.

# वाकण येथे बसथांब्याची मागणी

## गाडीसाठी प्रवाशांना उन्हात राहावे लागते उभे

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावर वाकण फाटा येथे प्रवासी यांच्यासाठी निवारा शेडची अत्यंत गरज आहे. भर ऊन्हात लहान मुले ते वयस्कर स्त्री पुरुष उभे असतात, आजूबाजूला कसलीच सोय नाही.



मुंबई-गोवा महामार्गावर वाकण फाट्यावरून महाड, मुंबई व खोपोली मार्गे पुण्याकडे जाण्याचे मार्ग आहेत. वाकण फाटा हा कायम वर्दळीचा आणि गजबजलेला असतो. अनेक गाड्या या ठिकाणी थांबतात, खोपोली वरून पाली मार्गे महाड चिपळूण साठी जाणारे प्रवासी तसेच पाली वरून खोपोली मार्गे पुण्याकडे,पनवेल, कर्जत कडे जाणाऱ्या अनेक गाड्या इथे थांबतात. वाकण फाटा परिसरात अनेक गावे आहेत, जवळच इस्पात कंपनी, वाकण पुला जवळून रोहा येथे जाण्याचा मार्ग आहे.

जवळ जवळपास औद्योगिक वसाहती उभ्या आहेत आणि महत्वाचा मुबई गोवा महामार्ग आहे. सद्या उन्हाळा एवढा प्रचंड वाढला आहे की, घराबाहेर पडू शकत नाही, अशी अवस्था झाली आहे.परिसरातील गावातून अनेक लोक वकण फाटा येथे येतात. ज्यांना राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवा आणि खाजगी इको रिक्षा किंवा रिक्षा याने प्रवास करणारे सर्व प्रवासी कामगार यांना वाकण फाटा येथेच यावे लागते.

मुंबई-गोवा महामार्गावर महाड चिपळूण दिशेला जाणाऱ्या प्रवाशी, कामगार व विद्यार्थी तसेच वाकण फाटा येथून पाली मार्गे खोपोली, पनवेल व कर्जत दिशेला जाणाऱ्या प्रवाशी कामगार वर्गाला निवारा शेड बांधून मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे, असे स्थानिक लोकांची मागणी आहे. सद्या शाळा, कॉलेज यांना सुट्टी आहे, त्यामुळे मामाच्या गावी जाण्यासाठी अनेक इच्छुक आहेत. तर लग्न सराई जोरदार सुरू आहे, त्याने वऱ्हाडी मंडळी प्रवास करीत आहे.

या दोन्ही ठिकाणी जवळपास झाडाची सावलीदेखील नाही, मात्र वयोवृद्ध आजी आजोबा किंवा एखादी माता लहान मुलाला कडेवर घेऊन भर ऊन्हात उभी असते, तेव्हा मात्र निवारा शेड ची आठवण येते. एसटी थांब्यावर निदान निदान लहान मुले त्याची आई आणि वयोवृद्ध आजी आजोबा यांना सावली देण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# खालापुरात पाण्यासाठी वणवण

## लग्न जमवतानाही डोक्यावरील हंडा ठरतोय अडसर

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे दोन महानगराचा मध्यबिंदू तालुक्याचे ठिकाण असलेले खालापूर शहराकडे लग्नाचे स्थळ शोधताना वधू-पिता पाठ फिरवत असून त्याला महत्त्वाचे कारण म्हणजे हुंडा नसून अद्यापही डोक्यावरून न उतरलेला हंडा आहे. ब्रिटिशांच्या काळात पेठ आणि नंतर तालुका म्हणून उदयास आलेले खालापूर गाव अद्यापही सोयी सुविधांच्या शोधात आहे. आरोग्य, शिक्षण, मनोरंजन तर दूरच पिण्याच्या पाण्याची तहान विहिरीवर भागवावी लागत असल्याने तालुक्याचे ठिकाण केवळ नावापुरते उरले आहे.



खेडोपाडी वाडी वस्तीवर शुद्ध पिण्याचे पाणी पोहचले असताना खालापूर वंचित राहिल्याचा फटका येथील छोट्या व्यापाऱ्यांना तसेच विविध व्यवसायांना बसला आहे. सणासुदीलादेखील बाजारपेठ ओस पडलेली असते. शिक्षण, पाणी आणि आरोग्याच्या सोयीसाठी खालापूर नगरपंचायत हद्दीतून अनेक कुंटुबाचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात झाले आहे. खोपोली, पनवेल, कर्जत भागात अनेक कुटुंब वैतागून स्थलांतरित झाली आहेत. सध्या लग्नसरायची धूम असली तरी खालापूरातील लग्न योग्य तरुण नोकरी, व्यवसाय असतानादेखील चांगले स्थळाच्या प्रतिक्षेत आहेत.

शहरातील मुख्य रस्ता ओलांडून डोक्यावरून हंडा घेऊन जाणाऱ्या महिलांची अवस्था पाहून मुलीसाठी स्थळ पाहताना खालापूर वर नकाराचा शिक्का मारला जात आहे. खालापुरात राजकीय बस्तान बसवलेले तसेच काही लोकप्रतिनिधीनीदेखील सेकंड होम म्हणून खोपोली, पनवेलचा आसरा शोधला आहे. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे खालापूरला शासकीय कार्यालयात अधिकारी म्हणून खुर्चीसाठी चढाओढ असली तरी खालापूरला राहताना अधिकारी नाखूष असल्याने तालुक्याचे ठिकाणी असलेल्या समस्यांची धग त्याना जाणवत नाही. तालुक्याचा सभोवताली विकासाचे वारे वाहत असताना खालापूर मात्र वावटळीत सापडल्यासासखी परिस्थिती आहे.

# किहीमचे सरपंच प्रसाद गायकवाड यांना धमकावले

## राजेंद्र ठाकूर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील किहीम ग्रामपंचायतीचे सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड यांना धमकावल्या प्रकरणी राजेंद्र मधुकर ठाकूर व त्यांचे पुत्र सम्राट राजेंद्र ठाकूर यांच्या विरोधात मांडवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किहीम ग्रामपंचायत हद्दीत रस्त्याचे काम सुरू आहे. या कामाच्या श्रेयावरून प्रसाद गायकवाड आणि राजेंद्र ठाकूर यांच्यात वाद आहे. या रस्त्याच्या कामाचे उद्घाट करण्यासाठी किहीमचे सरपंच प्रसाद गायकवाड गेले असता प्रसाद गायकवाड आणि राजेंद्र ठाकूर यांच्यात बाचाबाची झाली.

या प्रकरणी प्रसाद गायकवाड यांच्या पत्नी प्रीती गायकवाड यांनी मांडवा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. राजेंद्र ठाकूर व सम्राट ठाकूर यांनी माझे पती प्रसाद गायकवाड यांना शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली असे प्रीती गायकवाड यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीची दखल घेऊन राजेंद्र ठाकूर व सम्राट ठाकूर यांच्या विरोधात मांडवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेंद्र ठाकूर हे माजी आमदार स्व. मधुकर ठाकूर यांचे पूत्र आहेत.

# माजी विद्यार्थ्यांकडून उसर खुर्द हायस्कूलला संगणक संच भेट



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द हायस्कूलच्या सन २००२-२००३च्या माजी विद्यार्थ्यांनी स्नेहमेळाव्यात प्रसंगी दोन संगणक संच भेट दिले. १९ एप्रिल २०२५ रोजी अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द विद्यालयात २००२-०३ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा झाला.

माजी विद्यार्थी मुख्याध्यापक एन.डी सुर्वे व सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी व या विद्यालयातुन बदलून गेलेले व सेवानिवृत्त झालेल्या माजी शिक्षकांचा, शिक्षिका यांचा भेटवस्तु व गुलाबाचे रोप देउन गौरव केला.

दोन संगणक व एक रीवेलींग चेअर विद्यालयास भेट दिली. विद्यालयानेही सर्व माजी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. २२ वर्षानी एकत्र आलेले माजी विद्यार्थी शाळेची प्रगती पाहुन आनंदीत झाले.

बेंचवर बसण्याचा आनंद घेऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला. शाळेच्या झालेल्या प्रगतीबाबत माजी विद्यार्थ्यांनी गौरवोद्गार काढले.

# अलिबाग माणी फाटा येथे दगडफेक; गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

माणी फाटा येथे झालेल्या अपघातात दोन जणांच्या मृत्यूनंतर दगडफेक करणाऱ्या दिडशे जणांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणे, शासकीय कामजात अडथळा निर्माण करणे, पोलीस अधिकाऱ्यांना दुखापती करणे आणि वाहतूक रोखून धरणे या आरोपांखाली हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत मानी फाटा येथे एक अपघात झाला होता. इन्होवा गाडीने दुचाकीला धडक देऊन फरफटत नेल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेनंतर जमावाने अपघातास कारणीभूत असलेल्या इन्होवा गाडीची तोडफोड केली. गाडीच्या चालकाला मारण्याचा प्रयत्न केला. दगडफेक करून गाडीच्या काचा फोडल्या. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले, त्यांनी जमावाला शांतता राखण्याचे आवाहन केले, मात्र जमाव ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्यांनी दगडफेक सुरूच ठेवली. या दगडफेकीत पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. इन्होवा कार चालकाला आमच्या ताब्यात द्या अशी मागणी करत दगडफेक केली गेली. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. अखेर पोलीसांनी वाढीव बंदोबस्त बोलावून बळाचा वापर करत, परिस्थिती नियंत्रणात आणली.

या प्रकरणी आला १४ मुख्य आरोपींसह दिडशे अज्ञात व्यक्तींविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३चे कलम १८९(२),(३),१९१(२),१९०,१२१(१),२२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार मुंजाबा गायकवाड या प्रकरणाचा पूढील तपास करत आहेत.

# उसर गेल कंपनीविरोधात स्थानिकांचा काम बंद आंदोलनाचा इशारा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

उसर गेल इंडिया लि. कंपनीने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोकरी व रोजदांरीपासून अद्यापही वंचीत ठेवल्याने उसर गेल कंपनीस संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीचे अध्यक्ष निलेश गायकर यांनी कंपनी गेट समोर साखळी उपोषण व काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.

दरम्यान, कंपनी अधिकारांचे घरासमोर कटोरा घेवून भिक मागो आंदोलन छेदले जाईल असेही त्यांनी मुख्य महाप्रबंधक गेल इंडिया उसर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी रायगड, पोलीस अधिक्षक, पुनर्वसन अधिकारी व तहसीलदार अलिबाग यांना दिली आहे.

गेल इंडिया लि. कंपनीने शेतकरांची ४७५ एकर जमीन अत्यल्प दराने घेतली आहे, मात्र अद्यापही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कायमस्वरूपी नोकरी नाहीच, परंतू कॉन्ट्रॅक्ट बेसीकवर सुध्दा रोजंदारी देण्यापासून स्थानिक प्रकल्पग्रस्तांना वंचीत ठेवले आहे. मागील आंदोलनात १५० स्थानिक प्रकल्पग्रस्तांना रोजगार देण्याचा गेल इंडिया लि. कंपनी व्यवस्थापनाने आश्वासन दिले होते, परंतु आश्वासनाला केराची टोपली दाखविली असून अद्यापही प्रकल्पग्रस्ताला नोकरी व रोजदारी दिली नाही. स्थानिक गेल इंडिया लि. प्रकल्पग्रस्त शेतकरी अद्यापही कायमस्वरूपी नोकरी व रोजंदारीपासून वंचित आहेत.

# भाजप उत्तर व दक्षिण महाड अध्यक्षपदाची निवड

**महाड : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष महाड तालुक्याचे उत्तर महाड व दक्षिण महाड असे विभाजन करून, मंडल अध्यक्ष पदाच्या झालेल्या निवडणुकीत उत्तर महाडमध्ये निलेश देवगिरकर व दक्षिण महाड मध्ये निलेश तळवटकर यांची निवड झाल्याचे निवडणूक अधिकारी निलेश थोरे यांनी महाड येथे जाहीर केले.



महाड तालुका भारतीय जनता पार्टी मंडळ अध्यक्ष निवड प्रक्रिया २०२४/२५ अंतर्गत झालेल्या निवडणुकीत उत्तर महाड मंडल व दक्षिण महाड मंडळ असे दोन भागांच्या वेगवेगळ्या निवडणुका घेऊन यामध्ये महाड निवडणूक अधिकारी निलेश थोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या होत्या. भारतीय जनता पक्षाच्या महाड कार्यालयात उत्तर महाड व दक्षिण महाड मंडळ अध्यक्षाची नियुक्ती जाहीर करण्यात आली. लोकशाहीची निवडणूक प्रक्रिया खऱ्या अर्थाने राबविणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या महाड मंडल अध्यक्षाच्या निवडणुकीत संपूर्णपणे पारदर्शकता बाळगून पार पडली.

या निवडणुकीत उत्तर महाड मधून आठ उमेदवारांनी तर दक्षिण महाडमधून सात उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. दरम्यान, उत्तर महाड मधून निलेश देवगिरकर तर दक्षिण महाड मधून निलेश तळवटकर यांची निवड निलेश थोरे यांनी जाहीर केली.

या वेळी या दोन्ही मंडल अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, या वेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस बिपिन मामुनकर महिला मोर्चा रायगड जिल्हा अध्यक्ष मंजुषा कुद्रीमुदी, संदीप ठोंबरे, महिला मोर्चा महा तालुकाध्यक्ष मंजुषा जोशी, नीलिमा भोसले, महेश शिंदे, नमीता दोशी, चंद्रजीत पालांडे, डॉ.अजय जोगळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# माणगाव येथील क्षत्रिय मराठा भवनाच्या उर्वरित कामासाठी निधी उपलब्ध करणार

## खासदार सुनील तटकरेंचे आश्वासन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील क्षत्रिय मराठा भवन सामाजिक सभागृहाच्या उर्वरित कामासाठी नजीकच्याच काळात एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असून या सभागृहाचा लोकार्पण सोहळा एका वर्षात आपण करू असे अभिवचन रायगड - रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे यांनी क्षत्रिय मराठा समाज संघ माणगाव - तळा समाज बांधवांना दिला.



क्षत्रिय मराठा भवन माणगाव सामाजिक सभागृहाच्या तळमजला बांधकामाचा उदघाटन समारंभ रविवारी (दि.२०) खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते उत्साहात झाला. यावेळी उपस्थित समाज बांधवांना खासदार सुनील तटकरे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे शादाब गैबी, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी नगराध्यक्षा योगिता चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे काका नवगणे, ज्येष्ठ नेते रामभाऊ टेंबे, चंद्रकांत राऊत, गजानन अधिकारी, महादेव कनोजे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, माणगाव शहर राष्ट्रवादी अध्यक्ष नितीन वाढवळ, सामाजिक कार्यकर्ते दिपक मोरे आदींसह क्षत्रिय मराठा समाज संघ माणगाव - तळा तालुक्यातील समाज बांधव- भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना खासदार सुनील तटकरे म्हणाले की, क्षत्रिय मराठा हा विखुरलेला समाज एकसंघ ठेवण्याच्या दृष्टीकोनातून समाजाच्या संघाची निर्मिती झाली. अशा प्रकारच्या सामाजिक सभागृहातून वर्षातून तीन ते चार कार्यक्रम घेण्यापेक्षा सातत्याने या सामाजिक सभागृहातून नवनवीन उपक्रम राबविले गेले पाहिजेत. त्यातून समाजाला एक नवी प्रेरणा मिळेल. या सामाजिक सभागृहाच्या उर्वरित वरच्या मजल्याच्या कामाकरिता नजीकच्याच काळात आपण एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देऊ, मात्र याचे काम योग्य प्रकारे व उत्तम पद्धतीने झाले पाहिजे. एक देखणी वास्तू आपण उभारू येत्या वर्षभरात या सामाजिक सभागृहाचे लोकार्पण करू, असे खासदार सुनील तटकरे यांनी क्षत्रिय समाज बांधव भगिनींना आश्वासित करताना सांगितले.

या कार्यक्रमात आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात बोलताना क्षत्रिय मराठा समाज संघ माणगाव - तळा तालुकाध्यक्ष राजू मोरे यांनी सांगितले कि, सन २००९ -१० मध्ये या इमारतीच्या बांधकामाचा मुहूर्त रचला गेला. समाजाच्या या इमारत बांधकामासाठी सुरुवातीला समाज बांधवानी साहित्याच्या व रोख स्वरूपात मदत केली. या सर्व समाज बांधवांचे अध्यक्ष मोरे यांनी मनापासून ऋण व आभार व्यक्त केले. राजू मोरे पुढे म्हणाले नंतरच्या काळात कोरोना संकट आल्याने हे काम थांबले. त्यानंतर खा.सुनील तटकरे यांनी सुरुवातीला २५ लाख रुपये व नंतर पुन्हा एकदा खासदार निधीतून २५ लाख रुपये असा एकूण ५० लाख रुपयांचा निधी दिला. असे सांगत त्यांनी खासदार तटकरे यांचेही समाजतर्फे ऋण व आभार व्यक्त करीत या भवनाच्या उर्वरित वरचा मजल्याच्या कामाचा आराखडा तयार असून त्यासाठी एक कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असून तटकरे साहेबांनी हा निधी मंजूर करून या भवनाचे काम लवकरच मार्गी लावावे, अशी मागणी केली. यावेळी मोरे यांनी भवनाच्या कामास सहकार्य करणाऱ्या सर्वच दानशूर व्यक्तींचे ऋण व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी क्षत्रिय मराठा समाज संघ माणगाव- तळा तालुकाध्यक्ष राजू मोरे,कार्याध्यक्ष प्रताप सावंत, सचिव गणेश पवार, सहसचिव संजोग मानकर, खजिनदार दिपक कदम, ग्रुप नं.१ अध्यक्ष अजय रेणोसे,ग्रुप नं.२ अध्यक्ष प्रशांत अधिकारी, ग्रुप नं.३ अध्यक्ष अंकुश राऊत, ग्रुप नं.४ अध्यक्ष मंगेश सावंत यांच्यासह सर्व कार्यकारणी सदस्य व समाज बांधव - भगिनी यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवर व समाज बांधव यांचे चंद्रकांत राऊत यांनी आभार मानून कार्यक्रमाची उत्साहात सांगता केली.

# भीम गर्जना प्रतिष्ठानच्या कार्यक्रमाला प्रतिसाद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भीम गर्जना प्रतिष्ठान कलंबे शहापूर बोर शेती आसनगाव यांच्या विद्यमाने सुजित कासारे प्रस्तुत मानवंदना तथागताना बोधी सत्वांना हा भव्य दिव्य बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मराठी हिंदी गीते कलावंतांनी सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुक्त केले. महत्त्वाचे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागातील पत्रकार महेंद्र म्हात्रे यांनी चांगल्याप्रकारे साकारली तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे भूमिका रायगड जिल्ह्यातील खारपाडा पनवेल या दोन्हीही कलावंतांनी चांगल्याप्रकारे साजर केल्याबद्दल हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या रसिक प्रेक्षक कौतुक केले तसेच कार्यक्रमाचे सर्व कलावंतांचे आयोजकांचे वतीने अभिनंदन करण्यात आले.

महामानव भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला भीम गर्जना प्रतिष्ठान कळंबे बोर शेती प्रतिष्ठानचे अध्यक्ष मंगेश भडांगे व कमिटीचे अध्यक्ष संदीप कांबळे व सर्व पदाधिकारी यांनी कार्यक्रम यशस्वी केला तसेच भीम गर्जना प्रतिष्ठानतर्फे अनेक नागरिकांना व महिला वर्गांना पारितोषिक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी शासकीय विविध क्षेत्रातील मान्यवर पोलीस अधिकारी उपस्थित होते.



# नवी मुंबईत उबाठा गटाला खिंडार

## उद्या होणार शिवसेनेत जाहीर प्रवेश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मागील अनेक दिवसांपासून उबाठा, राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेस पक्षातील अनेक दिग्गज शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा नवी मुंबईत सुरु होती. त्यावर शिक्कामोर्तब झाले असून मंगळवारी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत जवळजवळ १३ माजी नगरसेवकांचा पक्षप्रवेश होणार आहे. त्यामुळे नवी मुंबई शहरात आगामी पालिका निवडणुकीच्या दृष्टीने शिंदे गटाने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली असल्याचे पाहायला मिळत आहे.

लोकसभा त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर काही पदाधिकारी यांनी आपल्या सोयीचे राजकारण साधत विविध पक्षात प्रवेश केल्याचे पाहायला मिळाले. नवी मुंबईत शिवसेना उबाठा गटाचे शहर संघटक सोमनाथ वास्कर व माजी नगरसेविका पत्नी कोमल वास्कर, महानगरप्रमुख रतन मांडवे व माजी नगरसेविका पत्नी सुनिता मांडवे, शहरप्रमुख काशिनाथ पवार, उबाठा गटाचे माजी नगरसेवक रंगनाथ औटी, भारती कोळी तसेच तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी नगरसेवक वैभव गायकवाड, दिव्या गायकवाड तसेच काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष अविनाथ लाड, माजी नगरसेवक अंकुश सोनावणे माजी नगरसेविका हेमांगी सोनावणे या सर्वांना मंगळवारी वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे शिवसेना शिंदे गटात प्रवेश होणार आहे. शहरभर याबाबतचे फलक झळकत असून या पक्षप्रवेशामुळे नवी मुंबईत राजकीय चर्चेला उधाण आले आहे.



आमचा पक्षवाढीसाठी आमचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या आदेशाने पक्षवाढीसाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असून मंगळवारी शहरातील विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात प्रवेश होणार असून आगामी काळात आणखी प्रवेश होणार आहेत. आमची ताकद वाढवण्याचा आम्ही सातत्याने प्रयत्न करत राहणार आहे.

**–किशोर पाटकर,**
जिल्हाध्यक्ष, शिवसेना शिंदे गट

आमच्या प्रभागातील नागरीकांशी चर्चा करुन नागरीकांच्या समस्या सोडवण्यासाठी तसेच प्रभागाच्या विकासासाठी शिवसेना शिंदे गटात सपत्नीक प्रवेश करणार आहे.

**–वैभव गायकवाड,**
माजी नगरसेवक, राष्ट्रवादी शरद पवार गट

## भाजपच्या नवनियुक्त मंडळ अध्यक्षांची बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूर मतदारसंघामध्ये झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या नवनियुक्त मंडळ अध्यक्ष यांची बैठक आज आमदार मंदा म्हात्रे व बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थित झाली.

या बैठकीला नवनियुक्त मंडळ अध्यक्ष निवडणूकीत अजय सिंग (बेलापूर) कुणाल महाडिक (नेरूळ–पूर्व) भास्कर यमगर (नेरूळ–पश्चिम) सुनील कुरकुटे (सानपाडा) पंकज आंबेरक (तुर्भे) विकास सोरटे (वाशी) आदी उपस्थित होते.

नवनियुक्त मंडळ अध्यक्ष यांची भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत नरीमन पॉइंट येथील भारतीय जनता पक्ष कार्यालयात निवड करण्यात आली आहे.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलताना सांगितले की, राज्यातील प्रत्येक कार्यकर्त्याने संघटन पर्वात उत्स्फूर्त सहभाग घेत ध्येयपूर्तीने १.५ कोटी सभासद करून आपला अविष्कार दाखविला आहे. त्याचे फलित म्हणून बेलापूर मतदार संघातील विविध मंडळ अध्यक्षपदी राष्ट्र आणि पक्षाचे काम ध्येयवादाने समर्पित कार्यकर्त्यांची निवड भाजप पक्षाने केली आहे. भाजपने केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा महाराष्ट्रासह देशपातळीवर तळागाळापर्यंत पोहचवण्याचे कार्य आपण करावे अशा शुभेच्छा देत दिल्या. सामान्य जनतेपर्यंत पक्षाची भूमिका मांडत पुढील वाटचाल करण्याचे मार्गदर्शन आमदार मंदा म्हात्रे यांनी बैठकीत बोलताना केले.

या वेळी मंडळ अध्यक्ष म्हणून नवनियुक्ती झालेल्या मंडळ अध्यक्षांना पेढे भरवून त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी आमदार मंदा म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्ता गोपाळराव गायकवाड, मनोहर बाविस्कर, प्रमोद जोशी, विजय घाटे, राजेश रॉय, प्रभाकर कांबळे, प्रताप भोस्कर, दर्शन भारद्वाज, मनी कोणार, संजय ओबेरॉय, अजय पासवान, जयसिंग पवार, किरण वर्मा, अजय वर्मा, मंगेश चव्हाण, भाऊ भापकर व असंख्य कार्यकर्ते तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## आदई तलावासमोर आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील आदई तलावासमोर मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर एका व्यक्तीचा मृतदेह आदळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत.

अनोळखी पुरूष वय ५० वर्षे अंदाजे, चेहरा– उभट, नाक–सरळ, वर्ण–गोरा, कपडे–नाही, बांधा–सडपातळ आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक बालाजी पवार (९८२३१७५०५१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# २८३.७०० किलो प्लास्टिक जप्त आणि ८५ हजार दंडात्मक वसुली

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमांव्दारे एकल वापरातील प्लास्टिकचा वापर थांबविण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिकेची विशेष पथके मार्केटमध्ये तपासणी करीत आहेत तसेच प्लास्टिकचा साठा वितरणासाठी वाहतुक करणाऱ्या वाहनांवरही लक्ष ठेवून कारवाई करीत आहेत.

अशा प्रकारच्या दोन प्रतिबंधात्मक धडक कारवाया लागोपाठ २ दिवस परिमंडळ २ च्या प्लास्टिक प्रतिबंधात्मक भरारी पथकांच्या वतीने उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आल्या. यामध्ये १७ एप्रिल रोजी महापे एमआयडीसी परिसरात दुचाकी



वाहनावरून प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा २० किलो साठा वाहून नेणाऱ्या दुचाकी वाहनावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला व त्याच्याकडील प्लास्टिक जप्त करून पाच हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली.

त्याचप्रमाणे याच परिमंडळ २ च्या पथकाने १८ एप्रिल रोजी ऐरोली टोल नाका येथे ६० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक दुचाकीवरून वाहतूक करणाऱ्या व्यक्तीकडूनही पाच हजार दंडात्मक रक्कम वसूली करून ६० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

याशिवाय १७ एप्रिलला कोपरखैरणे येथे सेक्टर १८ मधील रावराय जनरल स्टोअर्स यांचेकडून पाच किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करून पाच हजार दंडात्मक रक्कम वसूली करण्यात आली. त्याचप्रमाणे सेक्टर २० ऐरोली येथे महेंद्र प्रजापती यांचेकडूनही एक किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करून पाच हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली.

अशाप्रकारे परिमंडळ १ व परिमंडळ २च्या प्लास्टिक प्रतिबंधात्मक भरारी पथकांमार्फत उपायुक्त सोमनाथ पोटरे व डॉ.कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली एप्रिल महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात १७ व्यक्ती अथवा व्यावसायिकांकडून ८५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली असून २८३ किलो ७०० ग्रॅम प्रतिबंधात्मक एकल वापर प्लास्टिक साठा जप्त करण्यात आलेला आहे.

विशेषत्वाने एकल वापर प्लास्टिकमुळे मानवी जीवनाला व पर्यावरणाला पोहचणारा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी स्वत:हून स्वयंस्फूर्तीने प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णत: टाळावा व कापडी / कागदी पिशव्यांचा पर्याय निवडावा तसेच व्यावसायिकांनीही आपल्या वस्तू देण्यासाठी प्लास्टिक पिशव्या देऊ नयेत व प्लास्टिक पिशव्या दुकानात ठेवूच नयेत, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

## ३८ लाखांच्या मालाचा अपहार

**नवी मुंबई : बातमीदार**

महापे येथील केमट्रॉन सायन्स लॅबोरेटरीज या कंपनीतील मालाच्या अपहाराची घटना समोर आली आहे.

याप्रकरणी कंपनीच्याच कर्मचाऱ्यांवर तुर्भे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. कंपनीत कामावर असताना अधिकाराचा गैरवापर करून त्यांनी ३८ लाख ३७ हजारांच्या मालाचा अपहार केल्याचा ठपका ठेवला आहे. कंपनीच्या वतीने याबाबत पोलिसांकडे केलेल्या तक्रारीवरून याप्रकरणी तुर्भे पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## नवी मुंबई पालिकेने नष्ट केल्या ५०,२२७ मुदतबाह्य अभिलेख नस्ती



**नवी मुंबई : बातमीदार**

क्षेत्रीय कार्यालयांसाठी मुख्यमंत्री महोदयांनी १०० दिवसांचा कृती आराखडा जाहीर केलेला असून या अंतर्गत सात कलमी कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आघाडी घेतली असून महानगरपालिकेचे संकेतस्थळ अधिक अद्ययावत व वापरण्यास सुलभ करण्यात आलेले आहे. स्वतंत्र पही कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे अभिलेखांच्या निंदणीकरणानंतर आवश्यक नसलेला अभिलेख नियमांचे रितसर पालन करून नष्ट करण्यात आलेला असून मुदतबाह्य अभिलेखही नष्ट करण्यात येत आहे. यामध्ये तब्बल ५० हजार २२७ मुदतबाह्य नस्ती (फाईल्स) नष्ट करण्यात येत असून त्यामध्ये ब वर्गातील ४६, क १ वर्गातील ३६ हजार ८०८, क वर्गातील चार हजार ०६६ आणि ड वर्गातील नऊ हजार ३०७ नस्तींचा समावेश आहे. अशा एकूण ५० हजार २२७ मुदतबाह्य नस्ती ह्या नष्ट करण्यात येत असल्याची माहिती अभिलेख कक्ष विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांनी दिली आहे.

यामध्ये बेलापूर अभिलेख कक्षातील क १ वर्गातील नऊ हजार ९५५ नस्ती तसेच क वर्गातील दोन हजार ७४९ नस्ती त्याचप्रमाणे ऐरोली अभिलेख कक्षातील ब वर्गातील ४६, क १ वर्गातील २६ हजार ८५३ आणि क वर्गातील १३१७ नस्तींचा समावेश आहे. यासोबतच नऊ हजार ३०७ ड वर्गातील नस्तीही नष्ट करण्यात येत आहेत. अशाप्रकारे एकूण ५० हजार २२७ नस्ती नष्ट करण्यात येत आहेत.

अशा ५० हजार २२७ नस्तींमध्ये स्थानिक संस्था कर / उपकर विभागाच्या सर्वाधिक २३ हजार ०७० नस्तींचा समावेश आहे तसेच मालमत्ताकर विभागाच्या ६४७ नस्तींचा समावेश असल्याची माहिती या विभागाचे उपायुक्त शरद पवार यांनी दिलेली आहे.

कार्यालयीन स्वच्छतेवर भर देताना कागदपत्रे व नस्तींचे निंदणीकरण, तपासणी, नष्टीकरण व निर्लेखनाची प्रक्रिया सर्वच विभागांमध्ये व विभाग कार्यालयांमध्ये प्राधान्याने हाती घेण्यात आलेली असून सर्व अभिलेखांचे वर्गीकरण करून नियमानुसार 'अ वर्ग, ब वर्ग, क वर्ग, ड वर्ग' याप्रमाणे विहित कालावधीकरिता अभिलेख जतन करण्यासाठी अभिलेख कक्षाकडे पाठविण्यात आलेला आहे.

# डीपीएस तलावाबाबत पर्यावरणप्रेमींचा आनंदोत्सव

## वनमंत्री गणेश नाईकांचे मानले आभार

**नवी मुंबई : बातमीदार**

फ्लेमिंगोंच्या संवर्धनाबाबत महत्वाचा असलेल्या डीपीएस तलाव क्षेत्राला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संरक्षित व राखीव क्षेत्र करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली. यामुळे पाणथळ जागांच्या लढ्यास पाठबळ मिळाले आहे. या निर्णयांचे स्वागत करण्यासाठी तसेच आनंदोत्सव साजरा करण्यासाठी पर्यावरणप्रेमी रविवारी डिपीएस तलावालगत जमले होते. त्यांनी गुलाबाई रंगाचा पोशाख परिधान करून एकमेकांचे अभिनंदन केले. तसेच वनमंत्री गणेश नाईक यांचे विशेषत्वाने अभिनंदन करत आभार मानले. या वेळी गणेश नाईकांचे बॅनर्स देखील त्यांनी झळकावलेले पाहायला मिळाले.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या (एमओईएफसीसी) अंतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या वन्यजीव संस्था इंडियाने नवी मुंबईतील नेरूळ येथील एनआरआय पाणथळ जागेचाही जलचर पक्ष्यांसाठी




संवर्धन राखीव म्हणून समावेश करण्याची शिफारस केली आहे. ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्य (टीसीएफएस) व्यवस्थापन योजनेचा भाग म्हणून नवी मुंबई पाणथळ जागेचे जतन करण्याच्या आमच्या लढाईतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार म्हणाले. फ्लेमिंगो पक्ष्यांच्या जतनासाठी ठिकाणासाठी संवर्धन राखीव दर्जाची शिफारस करण्यासाठी राज्य वन विभागाने वन्यजीव संस्थेला डीपीएस फ्लेमिंगो तलाव क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी आमंत्रित केले होते.


संस्थेने 'फ्लेमिंगोसाठी नवी मुंबईच्या डीपीएस तलावाच्या महत्त्वावरील मूल्यांकन' मध्ये म्हटले होते की, त्यांच्या जमिनीवरील अभ्यासात टीसीएफएसच्या बाहेरील अरबी समुद्राच्या इनलेटमधील निवडक पाणथळ जागा समाविष्ट करण्याचे स्पष्टपणे नमूद केले. जेणेकरून जलचर पक्ष्यांसाठी आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे डीपीएस तलाव आणि एनआरआय तलाव फ्लेमिंगोसाठी व्यवस्थापित केले जातील. हा अहवाल मिळवणाऱ्या कुमार यांनी नवी मुंबईतील नेरूळ येथील डीपीएस फ्लेमिंगो तलावावर पर्यावरणप्रेमींनी आयोजित केलेल्या विजयी परेडमध्ये या शिफारशी स्पष्ट केल्या. ३० एकरच्या पाणवठ्यासाठी 'संवर्धन आरक्षण' टॅग साजरा करण्यासाठी ही योजना आखण्यात आली होती.

यापूर्वी, सिडकोने एनआरआय वेटलँडवर गोल्फ कोर्सची योजना आखली होती. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने एमओईएफसीसीला सादर केलेल्या पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (ईआयए) अहवालात गोल्फ कोर्स रद्द करण्यात आला आहे, असे कुमार यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

एनएमआयएएलने त्यांच्या पर्यावरण अनुपालन अहवालात वारंवार म्हटले आहे की बीएनएचएसने सुचविल्याप्रमाणे प्रकल्प क्षेत्राभोवतीची जैवविविधता जतन केली जाईल, ज्याने टीसीएफएस उपग्रह वेटलँड परिसंस्थेचा भाग असलेल्या या पाणवठ्यांचे जतन करण्याचे वारंवार आवाहन केले आहे.

अशा प्रकारे, या पाचही वेटलँड्सच्या संरक्षणासाठी डेक आता मोकळे झाले आहेत आणि सरकारने पाणवठ्या वाचवण्यासाठी रॉकेट वेगाने काम केले पाहिजे, असे ते म्हणाले.

### क्लिक...क्लिक...!



**मुरूड : समुद्रकिनारी सकाळी कावळ्यांची सभा भरली होती. यंदा पाऊस किती पडणार? आपल्याला घर बांधण्याची गरज आहे का, अशा विषयांवर जणू हे कावळे चर्चा करीत असल्याचे दिसून आले.** (छाया : सुधीर नाझरे)

# रंगछटा कवितासंग्रहाचे प्रकाशन

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जासई येथील रायगड जिल्हा परिषद प्रार्थमिक शाळा जासई येथे काल बालकांच्या रंगछटा या कविता संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. जासई शाळेच्या सहाय्यक शिक्षिका तथा प्रसिद्ध कवयित्री मिनल माळी यांच्या प्रतिभेच्या मार्गदर्शनातून आणि दातृत्वातून हा कवितासंग्रह तयार झाला असून, इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी मातीशी नाते सांगणाऱ्या स्वरचित कविता लिहिल्या आहेत. या विद्यार्थ्यांना स्फूर्ती आणि प्रोत्साहन देणाऱ्या कवयित्री मिनल माळी यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



हा उपक्रम जेवढा नवखा आहे, तेवढाच विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला, विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, भाषिक विकासाला तसेच भविष्याला आकार देणारा आहे. विद्यार्थ्यांच्या लेझीम संचालनातून ग्रंथदिंडी आणि पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी लेझीम संचलन सतीश भोईर व राजाराम कडू यांनी केले. प्रतिमा पूजन करून, ज्ञानरूपी पुस्तकाचे पूजन करण्यात आले. या वेळी कवयित्री तथा उपशिक्षिका मिनल माळी यांनी प्रास्ताविक सादर केले. लहान बालकांच्या हस्तलिखिताचे एका पुस्तकातून प्रकाशन होते आहे हे पाहून विद्यार्थ्यांच्या अंतरंगात फार मोठी आनंदाची लहर जागी झाली.

जासई शाळेचे मुख्याध्यापक सदानंद पाटील म्हणाले 'मी मुख्याध्यापक झाल्यापासून त्यांचे निरीक्षण करत आहे. माळी ह्या अनेक प्रकारचे उपक्रम घेत असतात हा एक उच्च दर्जाचा उपक्रम त्यांनी राबविला'. मुख्याध्यापक धुतुम नरेश मोकाशी यांनी मनोगत व्यक्त करताना असे म्हटले, माळी मॅडम ह्या धुतुम शाळेत कार्यरत असताना परिपाठामध्ये पारंपारिक प्रार्थना न घेता, त्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रार्थना त्या मुलांना शिकवायच्या'. हा विद्यार्थ्यांचा सोहळा पार पडताना शिक्षकवर्ग, विद्यार्थी, पालक यांनी सहकार्य केले आहे.

या कार्यक्रमासाठी के. एम. मढवी, वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, डॉ.सुभाष भोपी, वंदना पाटील, गणेश पाटील, आदित्य घरत, गोपाळ जाधव, नरेश मोकाशी, संजय पाटील, महेंद्र गावंड, समता पाटील आदी उपस्थित होते.

# रोह्यात हापूस आंब्याचे उत्पादन घटले; भाव वधारला

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात या वर्षी हापूस आंब्यासह अन्य आंब्याचे उत्पादन घटले आहे. त्यामुळे तालुक्यातील बाजारपेठेत या वेळी हापूस आंबा भाव खाताना दिसत आहे. किमान चारशे रुपयांच्या आसपास एका डझन आंब्याची किंमत आहे. त्या खालोखाल स्थानिक रायवळ, केसरसह बाहेरून विक्रीला आलेल्या आंब्याची किंमत आहे. वाढलेल्या भावामुळे ग्राहक आंबा खरेदी करताना हात आखडता घेताना दिसत आहे.



तालुक्यात आंब्याचे उत्पादन सुतारवाडी, तांबडी, घोसाळे, चणेरा, एनघर यासह अन्य परिसरात मोठ्या प्रमाणात घेतले जाते. तेथे हापूस आंब्याच्या बागा आहेत. तालुक्यातील आंबा लागवडीचे क्षेत्र १२०० हेक्टर एवढे आहे. यामध्ये प्रामुख्याने हापूस आंब्याचे क्षेत्र ९० टक्के असून उर्वरित केसर सह रायवळ व अन्य जातीची आंब्याची लागवड शेतकऱ्यांनी केलेली आहे. आंब्याचे उत्पादन हे एप्रिल महिन्यापासून नेहमी सुरू होतो. हा हंगाम जवळजवळ दीड ते दोन महिने चालत असतो. या वर्षी आंब्याचे उत्पादन गेल्या वर्षापेक्षा वीस ते पंचवीस टक्के घटले आहे. त्याचा परिणाम आंब्याच्या किमतीवर होताना दिसत आहे.

किंमत वाढल्याने खवय्यांना या वर्षी आंबा कमी खाण्यास मिळणार आहे. बाजारात चांगला हापूस एक डझन आंबा ४०० ते ५०० रुपये किमतीला उपलब्ध आहे. त्या खालोखाल अन्य आंब्याची किंमत डझनामागे कमी-जास्त आहे.

शासनाने ठोस भूमिका घेऊन आंबा उत्पादन वाढण्यासाठी बागायतदारांना सहकार्य करण्याची भूमिका घ्यावी, जेणेकरून कोकणातील आंबा उत्पादक आर्थिकदृष्टचा सक्षमपणे उभा राहू शकेल, अशी मागणी होत आहे.

### ही आहेत कारणे

***यंदा आंबा कमी उत्पादनाच्या प्रमुख कारणांमध्ये प्रामुख्याने थंडीचे प्रमाण कमी होते. त्याचा परिणाम आंबा उत्पादनावर झाला आहे. दुसरीकडे हापूस आंबा हा आळीपाळीने येत असतो. त्याचाही फरक पडलेला दिसून आला आहे, तर निसर्ग व तौक्ते चक्रीवादळाच्या वेळेला मोठ्या प्रमाणात बागातदारांच्या झाडांची नुकसान झाले होते. काही झाडे पडली होती. खोडकीड व काही प्रमाणात वादळवाऱ्याने कैऱ्या पडल्या. एकूणच आंब्याच्या उत्पादनावर परिणाम झाल्याचे दिसून आल्याचे तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी सांगितले.***

## कर्जतमधील मुलींची लैंगिक छळवणूक

# सर्व शाळांची आज समन्वय बैठक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातून खालापूर तालुक्यातील सेंट जोसेफ शाळेत विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या स्कूल बसमध्ये क्लिनरकडून अल्पवयीन मुलींची लैंगिक छळवणूक करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून नराधम तरुणाला अटक करण्यात आलेली आहे. असा प्रकार पुन्हा घडू नये यासाठी शिक्षण विभागाकडून सर्व शाळांची समन्वय बैठक सोमवारी (दि. २१) आयोजित केली गेली आहे.

कर्जतमधून शाळेत सोडण्यासाठी जाणाऱ्या बसमधील क्लिनरकडून अल्पवयीन मुलींचा लैंगिक छळ करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. करण दीपक पाटील (वय २५, रा. वदप, ता. कर्जत) असे नराधम क्लिनरचे नाव असून त्याला अटक करून बस जप्त करण्यात आली आहे.

खालापूर तालुक्यातील लोधिवली येथील सेंट जोसेफ स्कूलमध्ये शिकणाऱ्या कर्जतमधील विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी खासगी बससेवा आहे. या बसवर क्लिनर म्हणून करण पाटील हा तरुण काम करीत असून तो मुलींना ड्रायव्हरच्या मागील सीटवर बसायला सांगत असे. त्यानंतर त्यांना मांडीवर बसवून खासगी भागाला स्पर्श करायचा. नकार दिल्यास तर तो त्यांना मारायचाही.

दरम्यान, जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी यांच्या सूचनेनुसार कर्जत पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड यांनी संस्थाचालक, पालक यांची बैठक बोलावली आहे. ही बैठक कर्जत शहरातील गुंडगे भागात असलेल्या डॉन बॉस्को शाळेत होणार आहे. या बैठकीसाठी सर्व केंद्रप्रमुख तसेच जिल्हा परिषद शाळा आणि माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांच्याशी विनाअनुदानित अनुदानित आणि खासगी शाळा यांचे सर्व व्यवस्थापन यांना निमंत्रित करण्यात आले आहे तसेच प्रती शाळा एक पालक प्रतिनिधी, एक शिक्षक प्रतिनिधी, स्कूल बस चालक मालक संघटनेचे प्रतिनिधी यांना बोलावण्यात आले आहे.

या वेळी स्कूल बसबद्दल अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार आहेत. घडलेल्या प्रकारानंतर पालक, शिक्षक, संस्थाचालकांच्या सोबत बैठक घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता यासाठी नियमावली तयार करण्यासाठी शिक्षण विभागाकडून पावले उचलली जात आहेत. पोलीस प्रशासनही सतर्क झाले असून सर्व पातळीवर जागरूकता कायम ठेवण्यासाठी नियमावली बनविण्यावर भर देण्यात आला आहे.

नुकताच घडलेला गुन्हा आणि त्याचा तपास करणाऱ्या अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक मनीषा लटपटे या वेळी मार्गदर्शन करणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परिसरात घडणाऱ्या संबंधित घटना पाहता स्थापन केलेल्या सर्व समित्यांचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. त्यात परिवहन समिती, सखी सावित्री समिती १६ एप्रिल २०२५च्या शासन निर्णयानुसार स्थापन करावयाची विद्यार्थी सुरक्षा आणि भौतिक सुविधा विकसन समिती तयार करण्यावर भर देण्यात येणार आहे.

# 'आत्मा' संचालक अशोक किरनळी यांनी तळा तालुक्यातील शेतकऱ्यांशी साधला संवाद



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील तळगड शेतकरी उत्पादक कंपनी बोरघर हवेली व तळा नवकृषक शेतकरी उत्पादक कंपनी तळा या शेतकरी उत्पादक कंपन्यांना 'आत्मा' अर्थात कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेचे संचालक अशोक किरनळी यांनी भेट दिली. या वेळी त्यांनी शेतकरी उत्पादक कंपनी निगडित अडचणींबाबत शेतकऱ्यांशी संवाद साधला व अडचणी सोडविण्याचे आश्वासन दिले.

याबरोबर किरनळी यांनी पाणलोट प्रकल्प अंतर्गत त्यांना द्यावयाच्या विविध योजना, कंपनीसाठी आत्मा अंतर्गत अभ्यास दौरा, प्रशिक्षण, सेंद्रीय गटांना बीआरसी निर्मिती व विक्री व्यवस्था याबाबत मार्गदर्शन केले तसेच कंपनीचे व्यावसायिक प्रस्ताव, सभासद संख्या, राबवत असलेले उपक्रम इत्यादीबाबत माहिती जाणून घेतली.

यानंतर किरनळी यांनी रमेश सकपाळ यांच्या शेतावरील काळी मिरी पीक प्रात्यक्षिक, जय हनुमान सेंद्रिय शेतकरी गट खांबवली, कृष्णकांत पवार पिटसई यांचे हायड्रोपोनिक्स पीक प्रात्यक्षिक व कुंबेट येथे सुरेश कसबले यांच्याकडील नैसर्गिक शेती निविष्ठा निर्मिती, जुन्या आंबा फळबागेमध्ये काळीमिरी लागवड व हायड्रोपोनिक्स युनिट या शेतीमधील नाविन्यपूर्ण उपक्रमाची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला व शेतीविषयक अडचणी समजावून घेत मार्गदर्शन केले.

या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा आत्मा रायगड प्रकल्प संचालक वंदना शिंदे, आत्मा प्रकल्प उपसंचालक सतीश बोराडे, माणगाव उपविभागीय कृषी अधिकारी शुभम बोराडे, तळा तालुका कृषी अधिकारी आंनद कांबळे, मंडळ कृषी अधिकारी अतुल बाबर, कृषी सहाय्यक दिनेश चांदोरकर, गोविंद पाशीमे, आत्मा बीटीएम सचिन लोखंडे तसेच शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष, संचालक, शेतकरी, कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# वडखळ पोलीस ठाण्याला दुहेरी सन्मान प्राप्त

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ पोलीस ठाणे हे रायगड जिल्ह्यातील स्मार्ट पोलीस ठाणे ठरले असून या पोलीस ठाण्याला आयएसओ सर्टिफिकेट प्राप्त झाले आहे. या दुहेरी सन्मानाबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते वडखळ पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रसाद पांढरे यांना दोन्ही प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.



प्रसाद पांढरे यांनी वडखळ पोलीस ठाण्याच्या निरीक्षकपदी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी परिसरात नियोजनबद्ध आराखडा तयार करून तेथील कार्यरत अधिकारी, जमादार, पोलीस कर्मचारी यांच्यासह विविध उपक्रम राबविले. बजावलेले कर्तव्य, पोलीस ठाण्यात ठेवलेला नीटनेटकेपणा, स्वच्छता व अद्यावत अभिलेख यामुळे वडखळ पोलीस ठाणे जिल्ह्यातील स्मार्ट पोलीस ठाणे ठरले असून हे पोलीस आयएसओ मानांकन प्राप्त करणारेही पोलीस ठाणे ठरले.

सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या सहकार्यामुळेच हे यश मिळाले असल्याचे वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी सांगितले. वडखळ पोलीस ठाण्याला मिळालेल्या यशाबद्दल परिसरातून अभिनंदन होत आहे.

# मांजरवणेतील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मांजरवणे ग्रामपंचायतीच्या सरपंच आसमा अब्दुल जलील फिरफिरे, ग्रामपंचायत सदस्य राबिया हमजा सनगे, कासीम उमर सनगे यांच्यासह गावातील कार्यकर्ते व ग्रामस्थांनी खासदार सुनील तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.



युवक राष्ट्रवादी काँग्रेस रायगड जिल्हा कार्याध्यक्ष शादाब अहमद गैबी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि.२०)सुतारवाडी येथे झालेल्या या कार्यक्रमास जमातुल मुस्लिमीन मांजरवणे मोहल्ला अध्यक्ष तथा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच आजीम सरणकर, अखलाक फिरफिरे, मुजाहिद वलीले आदी उपस्थित होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी प्रवेशकर्ते सर्व मुस्लिम बांधव-भगिनींचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत केले. ते म्हणाले की, रायगड जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असताना चाळीस वर्षांपूर्वी या गावात येण्याची संधी मला मिळाली. तेव्हापासून या गावाची व माझी बांधिलकी आहे. हे गाव पूर्वी श्रीवर्धन मतदारसंघात होते. त्या वेळी या गावाचे नेतृत्व बॅरिस्टर अंतुलेसाहेबांनी केले. काही वर्षे आमदार म्हणून रवींद्र राऊत यांनीही या भागाचे नेतृत्व केले. त्यानंतर मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यावर हे गाव महाड विधानसभा मतदारसंघाला जोडले गेले. आज हे गाव आदितीच्या श्रीवर्धन मतदारसंघात नसले तरी माझ्या रायगड लोकसभा मतदारसंघात आहे. त्यामुळे आपण ग्रामस्थांनी गावातील जे प्रश्न सांगितले ते रायगडचा खासदार म्हणून प्राधान्याने सोडविले जातील. या गावाला विकासकामात कोणतीही अडचण येणार नाही.

या वेळी मांजरवणे ग्रामपंचायतीच्या सरपंच आसमा अब्दुल जलील फिरफिरे, ग्रामपंचायत सदस्य राबिया हमजा सनगे, कासीम उमर सनगे तसेच जहूर बडे, मोअज्ज़म फिरफिरे, दाऊद कर्जीकर, शौकत फिरफिरे, शकील सनगे, अब्दुल्ला सनगे, रहिमतुल्ला सनगे, आदम सनगे, सलमान फिरफिरे, दिलदार सनगे, बिलाल फिरफिरे, शहाजान सनगे, आदम वालीले, इकबाल सनगे, तनझिम सनगे, रजिया सनगे, फरजाना फिरफिरे, साजिद फिरफिरे, आमीना कर्जीकर, हालिमा फिरफिरे, शगुप्ता सरणकर यांच्यासह कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

# साखर येथे ग्रामदैवत पुनःप्राणप्रतिष्ठा, मंदिर लोकार्पण सोहळा

**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

सुभेदार नरवीर तानाजी आणि सूर्याजी मालुसरे यांच्या साखर गावाचे ग्रामदैवत आई नवलाई-भैरी यांची पुनःप्राणप्रतिष्ठा (जीर्णोद्धार) आणि पुनर्रचित मंदिराचा उद्घाटन सोहळा २४ व २५ एप्रिल रोजी संपूर्ण दोन दिवस धार्मिक आणि पारंपरिक रितीरिवाज पूर्ण करून पोलादपूर तालुक्यात होणार आहे. याबाबत अध्यक्ष विनायक मालुसरे आणि संतोष मालुसरे यांनी पत्रकार परिषदेद्वारे माहिती दिली.

नरवीर तानाजी मालुसरे यांचे पराक्रमी बंधू नरवीर सूर्याजी मालुसरे यांची चिरनिद्रा घेणारी समाधी आणि त्या वेळी त्यांची सौभाग्यवती सती गेल्या त्यांची सतीशिळा साखर गावात आहे. आठ वाड्यांची अशी पार्श्वभूमी असलेले साखर गाव पोलादपूर तालुक्यातील कामथी नदी, ढवळी नदी आणि महाबळेश्वरातून उगम पावलेल्या सावित्री नदी या तीन नद्यांच्या तिरावर वसलेले आहे. गावाला फार पूर्वीपासून ऐत्याहासिक, सामाजिक, राजकीय, पारमार्थिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे.

२३ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता नवीन मूर्तीचे आगमन त्यानंतर गाव प्रदक्षिणा करीत टाळ-मृदंग, सनई-चौघडा, लेझीम, ढोल ताशा यांच्या गजरात शोभायात्रा; तर २४ एप्रिलला सकाळी १० ते दुपारी २पर्यंत वेदशास्त्र संपन्न गुरुजी-संजय कुलकर्णी यांच्या हस्ते प्रधान संकल्प, श्री गणेश पूजन, पुण्यहवाचन, मुख्य देवता स्थापना, नवग्रह स्थापना, वास्तूप्रसाद होमहवन, मूर्तीचे अग्नुतारण, जलाधिवास, धान्याधिवास प्रधान हवन, मूर्तीचा पिंडिकान्यास, होमहवन होणार आहे.

२५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता मुख्यदेवता आई नवलाई आणि जोगेश्वरी, वाघजाई, भैरी, बापदेव, महादेव, जननी, सालूबाई, कालभैरी या मूर्तीची स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य अरविंदनाथमहाराज यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा, कलशारोहन योगीराज ब्रह्मचारी ह.भ.प. एकनाथमहाराज लाखे होणार आहे. दुपारी १ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हलगीवादक राजू आवळे पथक यांचे हलगी वादन, संध्याकाळी ५ ते ६ वा. साखर गावातील वारकऱ्यांचे सामुदायिक भजन, गावातील महिलांचा हरिपाठ, आळंदी येथील हभप एकनाथमहाराज लाखे यांचे रात्री ९ ते ११ वाजता कीर्तन होणार आहे. र१२ नंतर जेजुरी येथील जागरण गोंधळ होईल.

पोलादपूर तालुक्यातील सर्व समाजधुरीण, सगे सोयरे, आप्त, इष्टमित्र परिवाराने अत्यानंदाने या धार्मिक कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भरत चोरगे (उपाध्यक्ष), बाजीराव मालुसरे (सचिव), सखाराम बांद्रे (खजिनदार), दीपेश मालुसरे (कार्याध्यक्ष) यांनी केले आहे.

## डॉ. वरूण वागळेंना मेडिकल पदवी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यात गेली अनेक वर्ष वैद्यकीय सेवा पुरवणारे प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. आनंद वागळे व औद्योगिक वसाहतीतील वैद्यकीय सल्लागार डॉ. मिनल वागळे यांचे पुत्र डॉ. वरूण वागळे यांनी मेडिकलची गॅस्ट्रोएन्टेरोलॉजीमध्ये सुपर स्पेशालिटी (डॉ. एन.बी.) पदवी प्राप्त केली आहे.

डॉ. वरुण वागळे यांचा जन्म रोहा येथे झाला असून त्यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण जे.एम. राठी शाळेत झाले. पुढे ते एमबीबीएस सायन हॉस्पिटल, मुंबई येथून झाले. त्यानंतर त्यांनी एमडी (जनरल मेडिसिन) कस्तुरबा हॉस्पिटल, मणिपाल येथून पूर्ण केले.

# नागोठणे पोलीस ठाणे बनले 'स्मार्ट'

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे पोलीस ठाण्याला स्मार्ट पोलीस ठाणे पुरस्कार तसेच आयएसओ ९००१:२०१५ यामध्ये ए ++ नामांकन प्राप्त झाले आहे. याबद्दल प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांना जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे हस्ते गौरवविण्यात आले.



नागोठणे पोलीस ठाण्यामध्ये एकूण ३७ सुधारणा करण्यात आल्या असून सर्व ठिकाणी सूचना फलक लावण्यात आले आहेत. अभ्यागत कक्ष तयार करण्यात, बसण्यासाठी सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे. तक्रारदारांसाठी व्हिजिटर बुक ठेवण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बाथरूम तसेच सुसज्य प्रतीक्षालय बनवण्यात आले आहे.

नागोठणे पोलीस ठाण्याचे स्वरूप पूर्णतः बदलून टाकण्यात आलेले आहे. या सर्व निकषांच्या आधारावर तसेच पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी व त्यांच्या टीमने घेतलेल्या मेहनतीमुळे उपरोक्त पुरस्कार नागोठणे पोलीस ठाण्याला प्राप्त झाला आहे.

# लखनऊचा राजस्थानवर थरारक विजय

## आवेश खानची भेदक गोलंदाजी

**जयपूर : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सचा अजून एक सामना अखेरच्या चेंडूपर्यंत पोहचला आणि लखनऊ सुपर जायंट्स संघाने दोन धावांनी थरारक विजय मिळवला आहे. राजस्थानला अखेरच्या षटकात नऊ धावांची गरज होती, पण आवेश खानच्या यॉर्करसमोर राजस्थानचे फलंदाज अपयशी ठरले. संपूर्ण सामन्यात राजस्थानचा संघ सामन्यात पुढे होता, पण अखेरच्या दोन षटकांमध्ये संपूर्ण सामना फिरला.

दिल्ली कॅपिटल्सविरूद्धच्या सुपर ओव्हर झालेल्या सामन्यातील सारखीच स्थिती या सामन्यात पहायला मिळाली. राजस्थानला अखेरच्या षटकात नऊ धावांची गरज होती. ध्रुव जुरेलने पहिल्या चेंडूवर एक धाव घेतली. दुसऱ्या चेंडूवर दोन धावा घेतल्यानंतर तिसऱ्या चेंडूवर शिमरॉन हेटमायर झेलबाद झाला. चौथा चेंडू आवेशने कमालीचा यॉर्कर टाकला, ज्यावर एकही धाव घेता आली नाही.



पाचव्या चेंडूवर शुभम दुबेने मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्न केला आणि चेंडू हवेत उडाला, पण मिलरकडून कॅच ड्रॉप झाली. यासह राजस्थानला विजयासाठी एक चेंडूत चार धावांची गरज होती. शुभम दुबेला आवेशने अखेरचा चेंडू यार्कर टाकला आणि दोघेही फक्त दोन धावा घेऊ शकले यासह लखनऊने सामन्यात दणदणीत विजय मिळवला.

जयपूरमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सने प्रथम फलंदाजी करताना १८० धावा केल्या होत्या. सलामीवीर एडेन मारक्रम आणि मधल्या फळीतील फलंदाज आयुष बदोनी यांनी दमदार अर्धशतके झळकावली. प्रत्युत्तरादाखल राजस्थानकडून यशस्वी जैस्वालने शानदार अर्धशतक झळकावले, तर १४ वर्षीय वैभवने पदार्पण करत असताना त्यानेही शानदार फलंदाजी केली, मात्र पुन्हा एकदा राजस्थानचे फिनिशर संघाला विजयापर्यंत नेऊ शकले नाहीत.

लखनऊने प्रथम फलंदाजी करता २० षटकांत १८० धावांचा टप्पा गाठला. मिचेल मार्श या सामन्यात चार धावा करत बाद झाला असला तरी मारक्रमने संघाचा डाव उचलून धरला. मारक्रम ४५ चेंडूत पाच चौकार आणि तीन षटकारांसह ६६ धावा करत बाद झाला. आयुष बदोनीने अर्धशतकी खेळी करत संघाचा डाव सावरला. तरीही संघाने १९ षटकांत १५३ धावा केल्या होत्या. यानंतर संदीप शर्माच्या अखेरच्या षटकात अब्दुल समदने वादळी फटकेबाजी करीत चार षटकार लगावले आणि संघाला १८० धावांचा टप्पा गाठून दिला. समदने १० चेंडूत चार षटकारांसह ३० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.

# वाल्मिकी समाजातर्फे महिला क्रिकेट स्पर्धा उत्साहात



**उरण : बातमीदार**

उरण वाल्मिकी समाजाच्या वतीने मोरा रोड, सिद्धार्थ नगर येथे प्रथमच मुली आणि महिलांसाठी बॉक्स टाईप क्रिकेटचे सामने भरवण्यात आले. यामध्ये मोठ्या प्रमाणात मुली आणि महिला यांनी सहभागी होऊन खेळाचा आनंद लुटला.

स्पर्धेत सहा संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामना पापा की परी आणि लगान या दोन संघात झाला. अटीतटीच्या या सामन्यात पापा की परी संघाने लगान संघाचा पराभव करून विजेतेपद पटकाविले. दोन्ही संघांना रोख रक्कम आणि चषक, तर सर्व संघांना ट्रॉफी आणि खेळाडूंना मानचिन्ह देण्यात आले.

संपूर्ण स्पर्धा यशस्वी करण्यासाठी वाल्मिकी समाजाचे मुरारी वाल्मिकी, प्रेमपाल वाल्मिकी, राजेंद्र गुदरिया, सुनील पारचा, सूरज वाल्मिकी, बंटी वाल्मिकी, समील पारचा, सुरेश शर्मा, पप्पू वाल्मिकी इत्यादी मित्र परिवार यांनी मेहनत घेतली.

# आधी बरसला आणि नंतर भावूक होऊन तंबूत परतला!



**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शनिवारी जयपूरच्या मैदानात रंगलेला सामना १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने अविस्मरणीय केला. राजस्थान रॉयल्सच्या संघाकडून वैभवने दिमाखात पदार्पण केले. विशेष म्हणजे शार्दुल ठाकूरचा सामना करताना पहिल्याच चेंडूवर ८० मीटर लांब षटकार मारत त्याने यंदाच्या हंगामात धमाका करण्यासाठी तयार असल्याचे संकेत दिले.

आवेश खानचेही स्वागत षटकाराने करून जलदगती गोलंदाजाला घाबरत नाही हा तोरा या १४ वर्षाच्या पोराने दाखवला. मग पंतने फिरकीपटूच्या हाती चेंडू सोपवला. या पोराने स्पिनरला उत्तमरित्या खेळत १४ वर्षांचा असलो तरी क्रिकेटच्या मैदानात लिंबू टिंबू नाही ते दाखवून दिले.

अखेर मार्करमच्या गोलंदाजीवर तो फसला. राजस्थान रॉयल्सच्या डावातील नवव्या षटकात पार्ट टाइम बॉलर मार्करम याने पदार्पणाचा आयपीएल सामना खेळ–णाऱ्या वैभवला चकवा दिला. ऋषभ पंतने यष्टीमागे चपळाई दाखवत ही संधी साधली अन् वैभवच्या खेळीला ब्रेक लागला. त्याने २० चेंडूत दोन चौकार आणि तीन उत्तुंग षटकारासह कडक ट्रेलर दाखवून दिला.

विकेट गमावल्यावर वैभव भावूक झाल्याचे पहायला मिळाले. त्याला अश्रू अनावर झाले. पदार्पणाचा सामना अन् विकेट गमावल्यावर दाटून आलेला त्याचा हुंदका मोठ्या खेळीची हुकलेली संधी गमावल्याची मनातील खंत व्यक्त दाखवणारा होता.

# अझरुद्दीनच्या नावाचे स्टँड काढून टाकण्याचे आदेश

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

हैदराबाद क्रिकेट असोसिएशनला हैदराबादच्या उप्पल येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमच्या नॉर्थ पॅव्हेलियन स्टँडवरून मोहम्मद अझरुद्दीनचे नाव हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशाला माजी सरन्यायाधीश व्ही. ईश्वर यांनी मान्यता दिली आहे.

याचबरोबर मोहम्मद अझरुद्दीनच्या नावाने छापलेले कोणतेही तिकीट विकले जाणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे. भारताचा माजी कर्णधार आणि हैदराबाद क्रिकेट असोसिएशनचा माजी अध्यक्ष मोहम्मद अझरुद्दीन याच्यासाठी हा मोठा धक्का आहे.

क्रिकबझच्या वृत्तानुसार, एचसीएच्या २२६ संलग्न युनिट्सपैकी एक असलेल्या लॉर्ड्स क्रिकेट क्लब म्हणजेच एलसीसीने या वर्षाच्या सुरुवातीला तक्रार दाखल केल्यानंतर १९ एप्रिल रोजी हा निर्णय देण्यात आला. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी दाखल केलेल्या तक्रारीत असा युक्तिवाद करण्यात आला होता की, अझरुद्दीनच्या नावावर नॉर्थ स्टँडचे नाव ठेवणे हे एचसीएच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशन आणि त्याच्या अंतर्गत नियमांचे उल्लंघन आहे.

# अवघ्या ०.०१३ रनरेटमुळे विंडीजचा महिला संघ वनडे वर्ल्डकपमधून बाहेर

**कराची : वृत्तसंस्था**

भारतात या वर्षी आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक खेळला जाणार आहे. या स्पर्धेसाठी पाकिस्तानमध्ये पात्रता सामने खेळवण्यात आले, ज्यात एकूण सहा संघांनी भाग घेतला. शेवटच्या पात्रता सामन्यात वेस्ट इंडिजला विजयासाठी १६७ धावांचे लक्ष्य मिळाले. विश्वचषकाचे तिकीट मिळवण्यासाठी विंडीजला अवघ्या १०.१ षटकातच लक्ष्य गाठायचे होते, पण वेस्टइंडीजचा संघ अपयशी ठरला आणि अवघ्या चार चेंडूमुळे त्यांना विश्वचषकातून बाहेर पडावे लागले.



वेस्ट इंडिजचा संघ २०२५च्या क्रिकेट विश्वचषकासाठी पात्रतेच्या उंबरठ्यावर होता. पहिले समीकरण असे होते की, वेस्ट इंडिजच्या संघाने थायलंडने दिलेले १६७ धावांचे लक्ष्य १० षटके किंवा त्याआधीच गाठले तर ते रनरेटने बांगलादेशला मागे टाकून विश्वचषकाचे तिकीट मिळवतील. दुसरे समीकरण असे होते की, वेस्ट इंडिजने १०.५ षटकात १६६ धावा केल्या आणि पुढच्या चेंडूवर षटकार मारला असता तरीही ते विश्वचषकासाठी पात्र ठरले असते, मात्र विश्वचषक खेळणे विंडीजच्या नशिबात नव्हते, असे बोलणे वावगे ठरणार नाही.

वेस्ट इंडिजच्या महिला क्रिकेट संघाने १६७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऐतिहासिक विजय मिळवला. कर्णधार हेली मॅथ्यूजने २९ चेंडूत जलद ७० धावा केल्या, तर चिनली हेन्रीने १७ चेंडूत ४८ धावा केल्या. संघाने हा सामना फक्त १०.५ षटकांत जिंकला, पण त्यांनी हा सामना पाच चेंडू आधीच जिंकला असता त्यांचे नाव बांगलादेशऐवजी विश्वचषक खेळणाऱ्या संघांमध्ये समाविष्ट झाले असते. या पराभवामुळे दुःखी झालेल्या वेस्ट इंडिजच्या महिला क्रिकेटपटूंना त्यांच्या भावनांवर नियंत्रण ठेवता आले नाही आणि त्या मैदानावर रडू लागल्या.







उरण : भाजप संघटन पर्व अंतर्गत उरण विधानसभा मतदारसंघातील मंडळ अध्यक्षांची नियुक्ती लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.







पनवेल : भाजप संघटन पर्व अंतर्गत पक्षाच्या तळोजा मंडळ अध्यक्षपदी दिनेश खानावकर यांची आणि पनवेल शहर अध्यक्षपदी युवा नेते सुमित झुंझारराव यांची नियुक्ती झाली आहे. याबद्दल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी शहराध्यक्ष अनिल भगत आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.





पनवेल : भाजप संघटन पर्व अंतर्गत कळंबोली मंडळ अध्यक्षपदी अमर पाटील यांची आणि नवीन पनवेल मंडळ अध्यक्षपदी दशरथ म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस प्रल्हाद केणी, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com